
# भारत चीन संघर्षाचें स्वरूप

पां. वा. गाडगीळ

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १५११
९९६३

REFBK-0013094



शब्दरंजन स्पर्धा प्रकाशन

# भारत-चीन-
# संघर्षाचे स्वरूप

★

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

: लेखक :

पां. वा. गाडगीळ

REFBK-0013094

★

नोव्हेंबर १९६३

सर्व हक्क स्वाधीन

☆

किंमत १ रुपया

☆

प्रकाशक : जयंत साळगांवकर, शब्दरंजन स्पर्धा, रुक्मिणी निवास, मोरबाग रोड, मुंबई नं. १४

मुद्रक : धीरूभाई, देसाई, स्टेट्स पीपल प्रेस, जन्मभूमि भवन, घोघा स्ट्रीट, कोट, मुंबई.

# प्रस्तावना

साप्ताहिक 'नवशक्ती'त गेल्या मे ते जुलै या काळांत 'लाल चीनला समजून घ्या' या मथळ्याखाली मी लिहिलेली १० लेखांची लेखमाला, फलटणला चीनच्या आक्रमणावर गेल्या मार्चमध्यें मी दिलेले व नंतर मीच लिहून काढलेले एक व्याख्यान आणि गेल्या मे महिन्यात 'धनुर्धारी' साप्ताहिकात काश्मीरसंबंधाने मी लिहिलेला एक लेख यांचा हा संग्रह आहे.

गेल्या पाच सहा महिन्यातलाच हा मजकूर असून यांतील सर्व विषय आज ज्वलंत आहे. चीनच्या आक्रमणासंबंधीची सर्व आंतरराष्ट्रीय पार्श्व-भूमिका पहिल्या भागांत असून नेहरूंच्या परराष्ट्र धोरणाचे संक्षिप्त समालोचन दुसऱ्या व तिसऱ्या भागांत आले आहे. पहिला भाग जागतिक कम्युनिस्ट चळवळीचे स्वरूप कळून घेण्याला उपयुक्त आहे.

पुस्तक लहानसेच असल्याने त्यांतील विषयासंबंधानें प्रस्तावनेत अधिक लिहीत नाहीं. पण भारताच्या भावि अंतर्गत धोरणासंबंधाने माझ्या मनांत जे बरेच विचार जमत आहेत त्यांचे थोडेसे दिग्दर्शन करतो.

चिनी आक्रमणानंतर संरक्षणसंघटना बळकट करण्यासाठी जो अवाढव्य खर्च केला जात आहे त्याने अर्थसंघटना मजबूत व कार्यक्षम कर-ण्याचा फारसा प्रयत्न न होता उलट अर्थसंघटनेवर खर्चाचा भार कदाचित असह्य ठरेल इतका वाढविला जात आहे. नागरिक जीवनात राष्ट्रीय ऐक्यभावना व राष्ट्रीय कर्तव्यनिष्ठा वाढविण्याचा यशस्वी प्रयत्न होत नाही आणि फुटीरपणा व कलह वाढविण्याची सर्वच पक्षांत शर्यत लागली आहे. गेल्या पंधरा वर्षांत हेच धोरण चालले असून आज ते चिघळतेच आहे.

असे नागरी जीवन संरक्षणखर्चाच्या वाढत्या बोजाखाली कोसळण्याचा व त्यामुळे लोकशाही संकटात येण्याचा धोका असतो. या अवस्थेत भारताला ढकलणे हे चीनच्या आक्रमणाचे एक उद्दिष्ट होते व त्यात चीनला यश येत आहे असे दिसते. नेहरूसुद्धा कोणाच्या लक्षात हे काहीच येत नाही हे फार मोठे अरिष्ट आहे.

चीन आर्थिक संकटात सापडला असून रशियाचे व त्याचे भांडण लागले आहे, असे सांगून 'चीनचे अंतरंग' हा भाग संपविला आहे. पण यापुढे चीनची परिस्थिति वाईटच होत जाईल अशी खात्री नाहीं. इंग्लंड, कानडा, ऑस्ट्रेलिया, जपान, जर्मनी, कदाचित अमेरिका वगैरे राष्ट्रें चीनचा बाजार मिळविण्यासाठी आपसांत स्पर्धा करून चीनला आर्थिक साहाय्य करतील असा संभव आहे. तसे झाल्यास चीनचे धोरण आक्रमणाकडून आर्थिक विकासाकडे वळेल व त्यांची अर्थसंघटना आणि समाजसंघटना शिस्तबद्ध व कार्यक्षम असल्याने हा बदल त्यांना कठीण जाणार नाहीं.

भारताची समाजसंघटना व अर्थसंघटना शिस्तबद्ध व कार्यक्षम न करता संरक्षणसंघटना अधिक मजबूत करण्याने शरीर अधिक हाडकुळे करून त्याच्या हातात भारी वजनाची गदा देण्यासारखे होईल. मला याहून बरेच अधिक स्पष्ट व अधिक कडू बोलायचे आहे. पण सध्या येथेच थांबतो.

'नवशक्ति' व 'धनुर्धारी' यात प्रसिद्ध झालेले लेख प्रसिद्ध करण्यास त्या त्या संपादकांनी परवानगी दिली याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

माझे मित्र श्री. आठल्ये यांनी हे लेख पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याची सूचना केली. नंतर त्यांनीच श्री. साळगावकरांना भेटून प्रकाशनाची जबाबदारी घेण्याची विनंति केली व ती साळगावकरांनी मान्य केली. या दोघा मित्रांनी मजबद्दल ही जी आस्था दाखविली तीबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

या संग्रहांतील व या प्रस्तावनेतील मजकूर पक्षीय प्रचाराच्या दृष्टीने लिहिलेला नसून लोकशिक्षण करावे व काही वाचकात तरी मूलग्राही विचार करण्याची प्रवृत्ति निर्माण व्हावी अशा दृष्टीने लिहिला आहे. वाचकांनी याच दृष्टीने तो वाचावा.

पुन्हा एकदा आठल्ये व साळगावकर यांचे आभार मानून हे प्रास्ताविक पुरे करतो.

मुंबई ता. १४-११-६३ पां. वा. गाडगीळ

# अनुक्रमणिका

प्रस्तावना... ... ... ... ... ३

## भाग १ ला

लालचीनचे अंतरंग

१ आर्थिक दुःस्थिति ... ... ... ७
२ शेती का फसली ... ... ... ... ११
३ पक्षपक्कड कशी असते ... ... ... १५
४ ऐतिहासिक चीन ... ... ... २०
६ चिनी कम्युनिझमचे वैशिष्टय ... ... २५
७ स्टालिनचा माओस विरोध ... ... ३०
८ कॉमिटर्न व स्टालिन ... ... ... ३५
९ स्टालिन, माओ व क्रूशॉव्ह ... ... ... ४०
१० माओ, भारत व आशिया ... ... ... ४४
११ समारोप ... ... ... ... ५०

## भाग २ रा

चीनचे आक्रमण ... ... ... ... ५४

## भाग ३ रा

अमेरिका आणि काश्मीर ... ... ... ६५

मराठा ग्रंथ संग्रहालय. ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ......३६९५८...... वि: ......निबंध......
क्रमांक ......१५११...... नों दि: ......५५८४......

# भाग १ ला

# लाल चीनचे अंतरंग

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. B0८४

## आर्थिक दुःस्थिति १

लाल चीन फ़ार बिकट अशा आर्थिक तंगीत सापडला आहे, जनतेचे फार हाल होत आहेत. कम्युनिस्ट सत्ता कमालीची जुलमी व सक्तीची आहे. ही आर्थिक हलाखी व राजकीय जुलूम चिनी लोक कोठवर सोसतील असा प्रश्न हल्ली जिज्ञासू जगापुढे उभा आहे.

निरनिराळया देशातल्या लोकांची सहनशक्ति निरनिराळया पातळीवरची असते. ब्रिटिशांनी दुसऱ्या महायुद्धात फारच हालअपेष्टा व कष्ट सोसले. पण युद्धकालात जे हाल त्यानी स्वेच्छेने सोसले तेवढे हाल शांततेच्या काळांत आयातनिर्यातीत येणारी तूट कमी करण्यासाठी ब्रिटिश लोक सोसणार नाहीत. आणि त्यांच्यावर तशी सक्ती झाली तर समाजव्यवस्थेला धक्का पोचून तेथे कदाचित क्रांतिही होईल. इंग्रज लोकांपेक्षा क्रूरशोव्हच्या रशियातले लोक हाल व कष्ट सोसण्यात अधिक सहिष्णु आहेत. पण तेही चिनी लोकांइतके सहिष्णु असणार नाहीत.

चिनी लोक आज जरी कमालीचे हाल व कष्ट सोसत आहेत तरी संबंध इतिहासकालात त्यांनी हालअपेष्टा व कष्ट अतिशय सोसले असल्याने कमालीची सहिष्णुता त्याच्या अंगवळणी पडलेली आहे. पण म्हणून त्यांची-ही सहिष्णुता अमर्याद असेल काय?

आज चीनची सुमारे $\frac{1}{3}$ म्हणजे सुमारे २३ कोटि लोकसंख्या ठार करून तिचे खत चीनच्या शेतीत घातले तर चीनची आर्थिक तंगी संपून चीनमध्ये भरभराटीचा कालखंड सुरू होईल. पण या भावी भरभराटीसाठी चीनचे २३ कोटि नागरिक सरकारी हुकुमाने मरायला तयार होतील असे वाटत नाही.

२३ कोटि माणसांची कत्तल होणें ही अगदीच एकान्तिक भूमिका ठरेल. इतक्या जुलुमाच्या पुष्कळच अलीकडे चिनी जनतेची सहिष्णुता संपून ती बंड करील. पण बंड होण्याजोगी परिस्थिति आज आली आहे काय? नसली तर ती कितीशी दूर आहे?

गेली तीन वर्षं (१९५९–६२) चीनची जनता दरसाल शेतीचा भयंकर दुष्काळ अनुभवीत आहे. कम्युनिस्ट सरकारमार्फत 'मोठी उडी' (ग्रेट लीप) धोरण पुकारण्यात आले, ग्रामीण कम्यून्स स्थापण्यात आली, औद्योगिक उत्कर्ष खूप होत असल्याच्या बातम्या पसरल्या, अगदी लहान प्रमाणावर पोलाद तयार करण्याचे शेकडो 'परसातले कारखाने' ( बॅकयार्ड स्टील ) निघाल्याचे ऐकण्यात आलें. पण ग्रामीण कम्यून्स स्थापून झाल्यानंतरच्या तीनच महिन्यात निर्वासिताचा लोंढा हाँगकाँग व मकाऊ या बेटाकडे वाहू लागला.

त्यांनी कम्युन्सच्या टेबलावर जेवणाच्या थाळ्या रिकाम्या असल्याची बातमी आणली. मार्शल पेंग तेह हुई याने लुशानच्या सभेत "कम्युन्स मोडा आणि 'मोठी उडी' सोडा" अशी घोषणा केली. हाँगकाँग व मकाऊ या बेटा-वर येणारा निर्वासितांचा लोंढा चालूच राहिला, खेड्यापाड्यात अन्न नाही व उपासमार आहे याच बातम्या या निर्वासितांच्या तोंडून ऐकायला मिळत होत्या,ही परिस्थिति अशीच बिकट होत असता मोठे पुढारी कम्यून्स चालू ठेवण्याच्या हट्टास पेटले होते.

पण आर्थिक प्रगति घोषणांनी व हट्टानें चालू राहणार नव्हती. भांडवली कारखान्यांची उभारणी साधनाच्या अभावी व अन्नाच्या अभावी थांबली. १९६१-६२ साली औद्योगिक उत्पादन, एकूण उत्पादनक्षमतेच्या ३० टक्क्यापर्यंत खाली आले. तेव्हा कम्यून्स हळूहळू मोडण्याचे धोरण जाहीर करण्यात आले. सामुदायिक शेतीचे तुकडे लहान करण्यात आले. शेतकऱ्यांना लहान लहान खाजगी जमिनी देण्यात आल्या. पण १९५९, १९६० व १९६१ ही तिन्ही वर्षे शेतीच्या वाढत्या दुष्काळाचीच गेली.

हाँगकाँगला निर्वासितांची हकीकत ऐकून व परिस्थिति पाहून जे संशोधन केले जाते त्यावरून चिनी मजुराला दररोज दरडोई १३०० ते १६०० कॅलरीजच अन्न मिळत असल्याचे कळते. किमान शरीरपोषणाच्या दृष्टीने हे अन्न फार फार अपुरे आहे. इतक्या कमी पोषणाने माणसे जगतात कशी हेच आश्चर्य आहे असे संशोधक म्हणतात. शेतीची परिस्थिति खालावत असल्याच्या ३ वर्षात ती अधिकाधिक बिघडत आहे. हाँगकाँगकडे चिनी निर्वासितांचा जो लोंढा लागला होता तो हाँगकाँगच्या अडचणी वाढवाव्या म्हणून चीनच्या सरकारनेच योजला होता असे काही टीकाकारांचे म्हणणे आहे. पण त्याने चिनी सरकारची नापत होते याची काय वाट? कोणीही सरकार दुसऱ्या सरकारची अब्रू घेण्यासाठी स्वतांची अब्रू आधी अशी वेशीवर टांगणार नाही.

फोर्मोसाच्या सामुद्रधुनीस लागून असणाऱ्या फूकेन प्रांतात बरेच नवीन लष्कर चीनच्या सरकारने गेल्या वर्षी आणले होते. चँग कै शेकचा हल्ला होणार या भीतीने ही तयारी आहे असे सांगितले जात होते. पण फूकेन प्रांतात आधीच तीन लाख सैन्य असता हें आणखी सैन्य कशाला? चँग कै शेकला चिनी जनतेचा अथवा तेथल्या सैन्याचा पाठिंबा मिळेल या भीतीने हे अधिक सैन्य तेथे नेण्यात येत आहे एवढेच अनुमान यावरून काढता येत होते.

निर्वासितांचा लोंढा आणि सैन्याची हालचाल ही जी अंतर्गत दारिद्र्य व असंतोष यांची द्योतक अशी लक्षणे त्यापेक्षाही अधिक मोठे असे लक्षण

म्हणजे चाउ एन लायने जाहीर केलेले नवे धोरण हे होय. नॅशनल पीपल्स काँग्रेसच्या अधिवेशनात चाउ एन लाय म्हणाला "शहरे आणि औद्योगिक केंद्रे यांतील ३० टक्के जनता खेड्यात परत गेली पाहिजे." गेले वर्ष दीड वर्ष अशी शहरातून खेड्याकडे लक्षावधि लोकांची हकालपट्टी सुरू आहे.

कँटनमधून, २० लक्षापैकी ८ लक्ष लोक क्वांटंग प्रांतातील खेड्यापाड्यात हाकलण्यात आले. त्यांतूनच निर्वासितांचा मोठा लोंढा हाँगकाँगकडे पळून आला. शहरातून खेड्यात लक्षावधि माणसे हाकलली जातात. आणि तीही नियोजनपूर्वक औद्योगिक विकास होत असलेल्या मागासलेल्या चीनच्या शहरातून खेड्यात हाकलली जातात. याचा अर्थ औद्योगिक विकास एकदम खुंटला व शहरात बेकारी मरामर वाढत सुटली एवढाच होतो.

पण खेड्यातही अन्न नाही. शेती उजाड झाली आणि शेतीत असलेल्या माणसांनाच रोजगारी नाही, मग खेड्यात या नवीन येणाऱ्यांना रोजगारी कोठली देणार? शहरात घुमसून स्फोट होऊ शकणारा असंतोष खेड्यापाड्यात पाठवून पांगून टाकण्याची चाउ-एन लायची ही युक्ती आहे एवढाच या नव्या धोरणाचा अर्थ होय.

सुमारे तीन कोटि लोक शहरातून खेड्याकडे अशा प्रकारे हाकलले जातील. त्यांना निवळ रानोमाळ भटकावेच लागणार आहे. ही एवढी मोठी आपत्ति चीनमधील शेतीवर व शेतकऱ्यावर कोसळली व ही आपत्ति दूर होण्याची अथवा सौम्य होण्याची आशा मुळीच दिसत नाही. तरी पण चिनी कम्युनिस्ट नेत्यात फ़ूट पडली नाही. जनतेत त्याच्या विरुद्ध असंतोष असेलही. पण त्याचा अजून कोठे स्फोट झाला नाही.

याला अनेक कारणे आहेत. चिनी शेतकरी हालअपेष्टा व कष्ट याला सरावलेला आहे हे एक महत्त्वाचे कारण आहे. कम्युनिस्टांच्या पोलादी हुकुमशाहीचे पाश खेड्यापाड्यापर्यंत पसरले असल्याने विरोध संघटित व्हायला वावच मिळत नाही. शिवाय कम्युनिस्ट नेते चतुर आहेत. कम्यून्सचे धोरण फसले आहे असे पाहताच त्यांनी ते रद्द करून माघार घेतली हे तर

खरेंच. पण १९४८ साली क्रांती झाल्यापासून १९५८–५९ मध्ये कम्यून्समार्फत सामुदायिक शेती सुरू करीपर्यंत कम्युनिस्टानी एकेक पाऊल जपून, सामान्य शेतकऱ्याच्या कलाने घेऊन, टाकले.

लवचिकपणा हा चिनी कम्युनिस्टांच्या धोरणाचा गाभाच आहे. यामुळे १९४८ पासून १९५८ पर्यंतच्या दहा वर्षांत चिनी कम्युनिस्टांनी शेतीचा विकास फार वेगाने केला हे खरेच आहे पण मग कम्यूनसचा प्रयोग इतका का फसावा की साऱ्या शेतीची एकदम नासाडी व्हावी ? लागोपाठ तीन वर्षे लोकांची उपासमार होण्याइतके पीक का कमी यावे ? पाऊस, हवा इत्यादींची प्रतिकूलता हे कारण आहेच. पण गेल्या दहा वर्षांत ही संकटे आलीच होती. मग कम्यून्स सुरू केल्यानंतरच्या तीन वर्षातच हीं आपत्ति एवढी प्रखर का व्हावी ?

● ●

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम........................ वि: ........................
क्रमांक ........................ नों. दि. ....२....

# शेती का फसली

माओने क्रांतीनंतरच्या दहा वर्षांत शेतकऱ्याशी काहीशा सौम्यपणे वागून व त्याच्या कलाने घेऊन शेतीत पुष्कळ प्रगति केली होती असे मागील प्रकरणाच्या शेवटी सांगितले. आता त्याने कम्यून्सचा प्रयोग केल्यापासून त्याला अपयश का आले हे येथें पाहावयाचे आहे.

माओ स्टालिनचें अनुकरण करण्यामागे धावला व फसला असे दिसते. रशिया हे बलाढ्य असे लष्करी-औद्योगिक राष्ट्र व्हावे अशी स्टालिनची इच्छा होती तीच माओची चीनबद्दल आहे. स्टालिनने उद्योगधंदे वाढवण्यासाठी शेतीतून भांडवल उभारण्याचा निर्धार केला त्यासाठी शेतीचे पीक तर खूप वाढविले. पण शेतकऱ्याच्या जीवनाला कमीत कमी अवश्य एवढेच धन मिळून उर्वरित शेतीधन उद्योगधंद्याकडे नेता यावे अशी स्टालिनने योजना आखली. त्यासाठी पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या आरंभी शेती सामुदायिक

करण्यासाठी लक्षावधि कुलक चा स्टालिनने संहार केला. शेती सामुदायिक केल्यामुळे सारे पीक सरकारच्या स्वाधीन होऊन शेतकऱ्याना स्टालिनने कमीत कमी मजूरीवर राबविले. त्यामुळे पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या दोन वर्षात शेतकऱ्याचे राहणीमान ५० टक्के घटले होते.

पण शेतकऱ्यावर अनन्वित जुलूम करून का होईना स्टालिनने शेतीची व उद्योगधंद्याचीही प्रगति केली हे खास. मग माओला असे यश का आले नाही ? स्टालिनपेक्षा माओला एकच परिस्थिति अधिक अनुकूल होती. पण बाकी सर्व परिस्थिति जी स्टालिनला अनुकूल होती ती माओला सर्व–थैव प्रतिकूल होती. चिनी शेतकरी हुकुमाप्रमाणे काम करायला सरावलेला आहे इतकेच नव्हे तर सक्तीचे व अतिश्रमाचे कामही तो अत्यंत मना–पासून व कार्यक्षमतेने करतो. रशियन शेतकऱ्यात नसलेला हा गुण चिनी शेतकऱ्यात आहे. माओला पहिल्या दहा वर्षांत शेतीक्षेत्रात जे यश आले त्याला चिनी शेतकऱ्याचा हा स्वभाव फार मोठ्या अंशाने कारण झाला होता.

पण स्टालिनच्या देशात शेतीच्या मानाने लोकसंख्या थोडी असल्याने शेतीत स्टालिन यंत्राचाही वापर करू शकत होता तर माओच्या देशांत लोकसंख्येच्या मानाने शेती फार थोडी असल्याने शेतीवर माणसेच राबवणे माओला भाग होते. १९२८-२९ मध्ये स्टालिनने पहिली पंचवार्षिक योजना सुरू केली त्यावेळी रशियांत औद्योगिक विकासाचा पाया परिपूर्ण तयार झाला होता. इतका रशिया सुधारलेला होता. उलट माओच्या चीनमध्ये औद्योगिक मागासलेपणा कमालीचा होता. रशियात न वापरलेले सुप्त धन साधन कितीतरी होते. त्या बाबतीतही चीन दरिद्री होता.

पण माओच्या अपयशाला ही जी सर्व परिस्थिति कारण झाली त्या सर्वापेक्षा चीनच्या शेतीत इतरत्र न आढळणारे एक विशिष्ट स्वरूप त्याच्या अपयशाला कारण झाले. शेतीबाबत 'इन्टेन्सिव्ह (सघन) व 'एक्स्टेन्स्टिव्ह' (विकीर्ण) असे दोन शब्द नेहमी वापरतात. पैकी इन्टेन्सिव्ह म्हणजे सघन शेती याचा अर्थ खत घालून, सुधारलेले बी वापरून, मशागत

विशेष कष्टाने नियमितपणें व शास्त्रशुद्ध करून दर एकरी पीक अधिक वाढविणें. एक्स्टेन्सिव्ह अथवा विकीर्ण शेती याचा अर्थ शेतीच्या कामात अथवा साधनात सुधारणा न करता अधिकाधिक जमीन शेतीखाली आणणे.

स्टालिनच्या रशियात विकीर्ण शेती होतीच. तीत यंत्रे घालून त्याने ती सघनही केली. नवी नवी जमीन शेतीखाली आणणे व यंत्रे वापरणे या दुहेरी मार्गांनी तो आपली शेती सघन व विकीर्ण अशी दोन्ही प्रकारे वाढवीत होता. माओच्या चीनमध्ये शेतीत नवी जमीन येण्याला वाव फार थोडा होता आणि चिनी शेतकरी कष्टाळू व कार्यक्षम असून आधीच सघन शेती करणाराच होता. म्हणजे शेती अधिक सघन व अधिक बिकीर्ण करण्याला चीनमध्य आता वाव उरलेलाच नाहीं.

यंत्राच्या साहाय्यावाचून केलेल्या सघन शेतीचे विशेषतः तांदुळाच्या शेतीचे एक वैशिष्टच हे आहे की त्या शेतीला सामुदायिक शेतीची लष्करी अथवा कारखानदारी शिस्त चालत नसून शेतकरी स्वयंप्रेरणेने व लाभाच्या इर्षेने करील ती शेतीच यशस्वी होते. क्रांतीनंतरच्या कम्यु-निस्ट सरकारने, पूर्वी कोणत्याही सरकारने न दिलेले, विविध साहाय्य शेतकऱ्यास दिले आणि चिनी शेतकऱ्याने स्वतःच्या हिमतीने, ईर्षेने लाभप्रेरणेने यशस्वी शेती केली, पण १९५८ नंतर शेती अधिक सघन करण्याच्या महत्त्वाकांक्षेने माओने सामुदायिक शेती केली व कौटुंबिक जीवन मोडून कम्यून्स स्थापली. पण याचा उलट परिणाम असा झाला की सामुदायिक शेती व कम्यून्स यामुळे त्या शेतकऱ्याचा वैयक्तिक हिय्या लोपला.

भाताच्या नाजुक रोपाला लष्करी शिस्तीचे वेळापत्रक ठाऊक नव्हतें आणि त्या रोपट्याला वैय्यक्तिक शेतकऱ्याची प्रेमाच्या आपुलकीची सेवा जी वेळी अवेळी मिळायला हवी होती ती सामुदायिक शेतीच्या लष्करी शिस्तीत बसेना. सामुदायिक शेतीने शेतकऱ्यातली आपुलकी आटली आणि कम्यूनसमध्ये सामुदायिक जेवण, दिवसभर काम, सर्वांची मुलें बालक-गृहामध्ये, खाजगी घर असें नाहींच, यामुळें शेतकऱ्याच्या अंमची माणु-सकी, जिव्हाळा, ईर्षा हौस सारी लोपली. या स्थितीत हवापाण्यानेही

डोळे वटारले, तेंव्हा शेतीचा सर्वनाश व्हावा हे स्वाभाविकच होते. त्यामुळे कारखान्याच्या शहरांना धान्य व कच्चा माल पुरविणे अशक्य होऊन कारखान्याची उत्पादनशक्ति अपुरी वापरात येऊ लागली. अर्धवट उभारलेले कारखाने जेथले तेथेच थांबले. शेती व उद्योग या दोन्ही क्षेत्रातला विकास एकदम खुंटला. आणि एकदा साऱ्या खाजगी जमिनी हिसकून घेऊन सामुदायिक शेतीत आणलेल्या, व घरातून हाकून लावून सामुदायिक शेतीच्या गोठयांत बांधलेल्या शेतकऱ्यांना पुन्हा खाजगी शेतीत व खाजगी घरात परत घालणे हे काम फार दुर्घट झाले.

समुद्रातील खडकावर आपटून तुकडे तुकडे झालेल्या जहाजाचे सारे तुकडे पुन्हा शोधून, जूळवून व त्याचे परत पहिल्यासारखे जहाज करून त्यातून पुन्हा समुद्रप्रवास करण्याइतके तें काम दुर्घट असल्याचा अनुभव कम्युन्स मोडून सामुदायिकाऐवजी खाजगी शेती माओने सुरू करण्याचा प्रयत्न केल्यामुळे माओला येत आहे. १९६२ साली शेतीच्या पिकाची परिस्थिति सुधारली नाही.

निर्वासितांचा लोंढा सरकारी दडपशाहीने थांबविण्यात आला आहे. लोकांना दुःख असह्य झाले तरी लोक कम्युनिस्ट साखळदंडाने जखडलेले, भीतिग्रस्त आणि जुलुमाखाली गांजलेले असे असून ते बंड करतील हे अशक्य दिसते. परचक्राने चिनी कम्युनिझम उलथून पाडला जाईल हेही संभवनीय दिसत नाही. अमेरिका चैंग–कैशेकला चीनच्या भूमीवर चढाई करू देत नाहीं इतकेच नव्हे तर गेल्या पंधरा वर्षांत पश्चिमी राष्ट्रांनी चीनशी लढण्याचे प्रसंग सतत टाळले आहेत. शिवाय चिनी कम्युनिस्ट सरकार व रशियन सरकार यांचे भांडण केवढेही निकरावर गेले असले तरी परचक्राने अथवा अन्तर्गत बंडाने चीनचे कम्युनिस्ट सरकार उलथून पडेल तर त्यात रशियाचे मुळीच हित नाही. कारण चीनचे कम्युनिस्ट सरकार उलथून पडेल तर साऱ्या जगांतल्या कम्युनिस्ट चळवळीला त्याने मोठा धक्का बसेल. क्रुश्शॉव्ह असा प्रसंग येऊ देणार नाही.

काही अमेरिकनांच्या मते चीनमध्यें लष्करी बंड होण्याचा संभव

आहे. पण कम्युनिस्ट सत्तेविरुद्ध लष्करी बंड रशियांत राज्यक्रांति झाली त्यावेळी झाले तेवढेच. ते रशियन कम्युनिस्टांनी मोडून काढले. त्यानंतर कोणत्याही कम्युनिस्ट राष्ट्रांत लष्करी बंड झाले नाही. लष्करांत कम्युनिझमला तत्वनिष्ठेने वाहिलेले अधिकारी असतात. सैन्यात कम्युनिस्ट मताचा प्रसार फार मोठ्या प्रमाणांत झालेला असतो. कम्युनिस्ट पक्षाचे जबरदस्त वर्चस्व सैन्यावर असते. यामुळे कम्युनिस्ट राष्ट्रांत सैन्याचे बंड हे अशक्य कोटीतले झाले आहे.

रणांगणात कम्युनिस्ट सैन्याचा पराभव झाला तर कदाचित ते सैन्य त्याच्या सत्तेविरूद्ध बंड करीलही. पण भारतावरील आक्रमणांत चीनच्या सैन्याला रणांगणाच्या दृष्टीने एवढा प्रचंड विजय मिळाला आहे व चिनी कम्युनिस्ट सैन्याने हिमालय ओलांडून इतिहासात अद्वितीय असे कर्तृत्व गाजविल्याने एवढी मोठी कीर्ति त्याला मिळाली आहे की चिनी सैन्याची कम्युनिस्ट सरकारबद्दलची निष्ठा वाढलीच असून नजीकच्या काळात ही निष्ठा ओसरण्याचा संभव फार कमी आहे. ● ●

# पक्षपक्कड कशी असते ☆ ☆ ☆ ☆ ३

चीनच्या जनतेवर आर्थिक आपत्ति केवढीही कोसळलेली असो, चीनचा पराभव करील असे परचक्र आल्यावाचून अथवा अंतर्गत बंडाळी माजल्यावाचून माओची सत्ता उलथून पडण्याचा संभव नाही आणि चीनवर स्वारी करण्याचे धैर्य आज कोणत्याच राष्ट्रांत नसून चीनच्या जनतेवर कम्युनिस्ट सत्तेची घट्ट पक्कड बसली असल्याने जनता बंड करील हे कठिण दिसते असे मागील प्रकरणांत म्हटले आहे. पण 'कम्युनिस्ट सत्तेची पक्कड बसली' या म्हणण्याचा अर्थ तरी काय असतो ?

इतिहासकालात चीनवर अनेकदा परचक्र जसे आले आहे त्याचप्रमाणे जुलुमी सत्तेविरुद्ध शेतकऱ्यांची बंडेही झाली आहेत. सैनिकी बंडेही झाली आहेत. कम्युनिस्ट सत्तेखाली अशी बंडे होण्याचा संभव कमी का असावा ? याचे मुख्य कारण चिनी कम्युनिस्टांनी चीनच्या विस्तीर्ण मुलुखांतील जुनी राजकीय, सामाजिक, आर्थिक घडी संपूर्ण मोडून टाकून संपूर्ण नवी घट्ट घडी बसविली हे आहे.

भारताचे क्षेत्रफळ १२ लक्ष ६९ हजार चौरस मैल असून लोकसंख्या ४४ कोटीपर्यंत गेली आहे तर चीनचे क्षेत्रफळ ३९ लक्ष चौरस मैल असून लोकसंख्या ७० कोटि आहे. या तुलनेवरून चीन केवढा प्रचंड आहे याची कल्पना येते. या प्रचंड चीनवर इतिहासकालात कधीच सुस्थिर व एकछत्री अंमल नव्हता. कम्युनिस्टांनी १९४९ च्या ऑक्टोबरात चीनमध्ये सत्ता काबीज करून चँग कै शेकला देशाबाहेर पिटाळून लावल्यानंतर हजारो वर्षांच्या इतिहासांत पहिल्यानेच सर्व चीनची भूमि अखंड एकछत्री अमलाखाली आणली. चीनच्या मध्य सरकारात, प्रांतांत, जिल्ह्यात, खेडयात कोठेही असलेले जुने सत्ताधारी हुसकून लावून कम्युनिस्टानी कम्युनिस्ट मताची, कम्युनिस्ट निष्ठेला वाहिलेली माणसे सर्व अधिकाराच्या मोक्याच्या जागी नेमली.

शेतीत श्रम न करणाऱ्या मोठ्या जमिनमालकांना पिटाळून लावून कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांना जमिनी दिल्या आणि शेतकऱ्यांच्या सहकारी संघटना काढून शेतकऱ्याचे आर्थिक व खाजगी जीवनही सहकारी संघटनेच्या घट्ट जाळयात विणले. मोठ्या कारखान्यांचे बहुतेकांचे राष्ट्रीकरण व कांहींचे कठोर नियंत्रण करून चीनएवढ्या प्रचंड देशाची खेडयापासून शहरापर्यंत पसरलेली मागासलेली व म्हणून मुळची विस्कळीत असलेली अर्थसंघटना कम्युनिस्टांनी एका नियोजनाच्या धोरणात जखडून टाकली.

चँग कै शेकच्या काळांत सन्यत्सेनच्या विचारसरणीचे दडपण चीनच्या राजवटीवर असून अमेरिकेतील व्यक्तिस्वातंत्र्यप्रधान लोकशाही व

रशियातील कम्युनिस्ट हुकुमशाही या दोन मतांची भेसळ उर्फ गोंधळ राज्यकर्त्यांच्या डोक्यात असे. कम्युनिस्ट अमलात ही ओढाताण अथवा ढिलाई थांबून कार्यक्षम अशी एकमुखी, एकधोरणी अर्थसंघटना चीनमध्ये निर्माण झाली.

भारतांतल्या अर्थसंघटनेशी तुलना करून चीनच्या कम्युनिस्ट अंमलातील अर्थसंघटनेची कल्पना करता येणार नाही. येथे कमालीचा व्यक्तिवाद व पुष्कळसा गोंधळच आहे. चीनच्या अर्थसंघटनेच्या कोणत्याही अंगाशी भारतांतील अर्थसंघटनेच्या कोणत्याही अंगाची तुलना होऊच शकणार नाही.

कम्युनिस्ट पक्षसंघटना समाजाच्या रोमारोमात कशी शिरते हे पाहण्यासारखे आहे. पक्षाच्या सदस्याला पक्षाचे मूलभूत वाङ्मय चांगले पढावे लागते. लेखी व तोंडी वादविवादात पक्षसदस्याना तरबेज केले जाते. बौद्धिक दृष्टचा तरबेज, सोपवून दिलेल्या कामात वाकबगार व पक्षाला निष्ठा वाहिलेले हजारो पक्षसदस्य देशांतील प्रचंड आर्थिक व राजकीय यंत्रणेत सर्व महत्वाच्या जागी नेमलेले असतात. पक्षाबाहेरच्या कोणाच्याही रागाला अथवा मोहाला ते बळी पडत नाहीत, पण पक्षवरिष्ठाची केवढीही कडक शिस्त वंदनीय मानतात.

या खास सरकारी अथवा सरकारनियंत्रित अशा राजकीय व आर्थिक यंत्रणेखेरीज शेतकरी, कामकरी, महिला, युवक, विद्यार्थी, बुद्धिवादी, कलावंत, विविध कारागीर, लेखक, शास्त्रज्ञ अशा, कल्पना करता येतील इतक्या विविध वर्गांच्या संघटना सर्व चीनभर असून हा एक प्रकारे संघटनास्वातंत्र्याचाच देखावा उभारलेला असतो. पण अशा संघटनेत मोक्याच्या जागीं कम्युनिस्टांची वर्णी लागली तरच अशा संघटना नांदू दिल्या जातात. तरतरीत, तरबेज, कठोर, ध्येयनिष्ठ, शिस्तनिष्ठ असेच स्त्री-पुरुष-सदस्य कम्युनिस्ट पक्षाचे असतील याबद्दल दक्षता घेण्यात येते.

चाऊ एन् लाय, च्यू तेह, लिऊ शाओशी, माओत्सेतुंग हे अगदी शिखरावरचे पुढारी आणि खालच्या खालच्या टप्प्यावरचे शेकडो पुढारी गेली चाळीस वर्षे चँग कै शेकच्या सैन्याशी, जपानशी व, यादवीच्या काळात खेडयापाडयातून मोकाट सुटलेल्या गुंड सैनिकाशी लढून क्रांतिवीर झाले आहेत. आणि कुशल शिकाऱ्यांनी बलवान हत्तीला जाळचात पकडून जखडावा तसा या कम्युनिस्टानी चिनी समाज जखडून टाकला आहे.

जुन्या धार्मिक व सामाजिक अशा सर्व संघटना या कम्युनिस्टानी उखडून काढल्या असून त्यांच्या विषयी नवतरुणाच्या मनात चिनी कम्युनिस्टानी अनादर निर्माण केला आहे. जुन्या विचाराच्या वडील माणसांना मान देण्याऐवजी कम्युनिस्ट पुढाऱ्यांना अधिक मान देण्याची शिकवण तरुणांना दिली जाते.

स्त्रीस्वातंत्र्याचा फार मोठा पुरस्कार चीनमध्ये झाला आहे. याचा अर्थ अमेरिकेत स्त्री मोकाट होऊ लागली आहे म्हणतात तसे हे स्त्रीस्वातंत्र्य नव्हे. चूल व मूल एवढेच स्त्रीचे क्षेत्र नसून चिनी समाजाच्या सर्व जीवनात स्त्रीपुरुष समतेने वावरतात. पक्षसंघटनेत स्त्रिया सर्व उच्च जागाँवर पुरुषाबरोबरीने आहेत. पति व पत्नी यापैकी एक कम्युनिस्ट नसेल तर संसार मोडतोच. अर्थसंघटनेत व राज्यसंघटनेत सर्व प्रकारचे उच्च शिक्षण घेतलेल्या स्त्रिया सर्व श्रेणीत आहेत. जुनी कुटुंबसंस्था मोडून काढण्याचा कम्युनिस्टांचा निर्धार आहे.

पण ते फार जपून पावले टाकतात. कम्युन्समध्ये शेती सामुदायिक झाली इतकेच नव्हे, तर कुटुंबे विस्कटली, बालके शिशुगृहात गेली, त्याहून मोठी मुलें शाळांच्या बोर्डिंगात गेली, पतिपत्नी मुलापासून वेगळी करण्यांत आली आणि नांगरासाठी वापरावयाचे बैल जसे गोठयात बांधण्यात येतात त्याप्रमाणें शेतीत श्रम करण्यासाठीं जिवंत राहणारे स्त्रीपुरुष शेतीजवळ श्रमिकासाठी उभारलेल्या बराकीत राहू लागले.

पण अशा या कम्युन्समुळे शेतकरी मरगळला, शेतीचे उत्पादन घटले. म्हणून आता चीनने कम्यून्स मोडली आहेत. कम्यून्सची ही कल्पना नवी नव्हे. स्टालिन, क्रुशॉव्ह वगैरेनी ती अव्यवहार्य ठरविली होती. माओने चीमनध्यें ती हट्टाने अंमलात आणली. ती फसली म्हणून माओने तूर्त ती कल्पना सोडली आहे. पण तो जर अजून बराच काळ जगला व सत्तापदावर राहिला तर पुन्हा कोणत्या ना कोणत्या स्वरुपात ही कम्युन्स स्थापल्याशिवाय राहणार नाही.

एकूण चिनी समाजापैकी ५ च टक्के स्त्री-पुरुष कम्युनिस्ट पक्षाचे निष्ठा-वंत सभासद आहेत. पण त्यांनी एकमेकांच्या हाताला हात बांधून व त्यायोगे समाजसंघटनेला वेढून ती त्यांनी जखडून टाकली आहे.

"इतक्या सहजपणे मानव संघटना बदलता येते ही गोष्ट चीन समक्ष पाहिला नसता तर मला खरी वाटलीच नसती," असे उद्‌गार चीनमध्ये विस्तृत पर्यटन करून हाँगकाँगमध्यें नुकत्याच आलेल्या एका निरीक्षकाने काढले होते. "सहजपणे याचा अर्थ दुःखावाचून असा असला तर तो खरा नव्हे. फक्त जलद एवढ्या अर्थाने 'सहज' हा शब्द खरा आहे." असे तोच निरीक्षक म्हणतो.

जनतेला अनन्वित व असह्य दुःख भोगावे लागले आहे. पण दांडगट व आडदांड बैलाला नाल मारण्यासाठीं जसा पायात दोरी घालून प्रथम जमीनीवर आडवा पाडतात व नंतर शिंगासुद्धा सर्वत्र दोरीने बैलाला जखडल्यावर घिसाड्याचे लहान पोरही त्याच्या पायाला नाल मारते त्याप्रमाणे चिनी कम्युनिस्टांनी चिनी समाजाला जखडले असून खेड्यापाड्यापर्यंत पसरलेले छोटे मोठे 'माओ' त्या समाजावर बिनदिक्कन राज्य करीत आहेत. असा हा जखडलेला समाज केवळ दुःख असह्य झाले म्हणून बंड करील हे अशक्य वाटते. ● ●

# ऐतिहासिक चीन ☆ ☆ ☆ ☆ ☆ ☆ ४

एकजिनसी हुकुमशाहीवर (टोटॅलिझम) चिनी कम्युनिस्टांचा केवढा दृढ विश्वास आहे व त्या हुकुमशाहीची कम्युनिस्टांची कल्पना किती खोल, व्यापक व सर्वस्पर्शी आहे हे सांगतांना ए. डोक बार्नेट हा प्राध्यापक आपल्या एका भाषणांत म्हणतो, "सामान्य जनतेच्या जीवनावर जास्तीत जास्त देखरेख करून त्याचे संपूर्ण नियंत्रण करणे, सरकारदिग्दर्शित लोक-व्यवहारात सर्वच्या सर्व जनतेला सक्रिय गोवणे, लोकांच्या विचाराचे व आचाराचे जास्तीत जास्त नियंत्रण करणे आणि नव्या कम्युनिस्ट राजवटीला राष्ट्रीय उद्दिष्टांसाठीं लक्षावधि, कोटयवधि चिनी लोकांना जास्तीत जास्त कार्यान्वित करणे, या कार्यपद्धतीवर कम्युनिस्टांचा विश्वास आहे."

एकूण लोकसंख्येतले पांच टक्के लोक, जे या निष्ठेने दृढपणे भारले गेले आहेत, व जे कम्युनिस्ट पक्षाचे सदस्य आहेत त्यांना पूर्ण संघटित-पणे गेल्या चौदा वर्षात चीनच्या सत्तर कोटी समाजास पकडीत धरून कामास जुंपले आहे. या कम्युनिस्ट पक्षाचे शेकडो पुढारी देशाच्या सर्व विभागांतून आयुष्यभर समाजसेवा करीत आले आहेत, भट्टीत वितळवून शुद्ध केलेल्या पोलादाप्रमाणे यादवीत, आंतरराष्ट्रीय युद्धात तावून सुलाखून निघालेले आहेत, त्यातले पुष्कळजण चाळीस चाळीस वर्षे आघाडीवर आहेत व दर वर्षी हाती येणाऱ्या नव्या पिढीला ध्येयनिष्ठेबाबत, शारीरिक शक्तीबाबत आणि नियोजित प्रगतिकार्याच्या अनुभवाबाबत, सर्कशीत माणसे व जनावरे शिकवून तयार करावी त्याप्रमाणे, त्यानी शिकवून तयार केले आहे.

समाज बदलतो कसा बदलावा कसा, यासंबंधाने पाश्चिमात्य कल्पनेहून चिनी कम्युनिस्टांची कल्पना मूलतःच वेगळी आहे. पाश्चात्यांना वाटते की

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे शाखा दा. क. ३०८४

सामान्य जनतेतल्या बहुसंख्य लोकांना भासमान होणाऱ्या गरजा भागविण्यासाठीं समाजात पालट होत असतात व ते हळुहळू होतील तरच ते यशस्वी होतात. "परंपरागत समाज-व्यवस्था दृढमूल असते. तीत एकदम बदल करू जाता ठोकर खावी लागून समाजाला मनस्वी दुःख भोगावे लागते म्हणून सामाजिक बदल हळूहळूच करावा" असा पाश्चात्यांचा आग्रह असतो.

कम्युनिस्टांची कार्यपद्धति याहून मूलतःच वेगळी आहे. सत्ता काबीज करण्यासाठी लढताना ते पाश्चात्य लोकाशाहीची सारी सोंगे आणतात' 'लोकांच्या जिव्हाळ्याच्या गरजां'चेच प्रश्न ते प्रथम हाती घेतात, पण एकदा सत्ता हाती आली म्हणजे मग लोकांच्या तात्कालिक गरजांचा विचार ते करीत नाहीत. कम्युनिस्ट पक्षाने ठरविलेल्या अंतिम सामाजिक उद्दिष्टाकडे दृष्टि लावून ते उद्दिष्ट जास्तीत जास्त जलद साधण्यासाठीं ते रणरचना करतात व प्रत्येक रणावश्य कार्यासाठी लष्करी हुकुमशाहीने व यंत्राच्या नियमितपणाने माणसांना राबविण्याचा निष्ठुर प्रयत्न करतात. माणस हा माणूस आहे याचा त्यांना विसरच पडतो व ते माणसाला यंत्र बनवू पाहतात.

चिनी कम्युनिस्टांच्या सुदैवाने कम्युनिस्टांच्या या धोरणाला चीनच्या ऐतिहासिक परंपरेची अनुकलता मिळाली आहे. चीनच्या सबंध इतिहासांत व्यक्तिस्वातंत्र्याचा मागमूस नाहीं. कुटुंबघटक हीच व्यक्तीची भूमिका. कुटुंबप्रमुखाच्या हाती सत्ता केंद्रित होणे, त्याच्या हुकुमाप्रमाणे सर्वांनी वागणे ही रुढी चिनी लोकांच्या हाडीमाशी खिळली आहे.

हीच परम्परा राष्ट्राबाबतही कायम झाली. कॉन्फ्युशिअस हा चिनी लोकांचा 'मनु'. तो दोन हजार वर्षापूर्वी होऊन गेला. त्याने घालून दिलेल्या धड्याप्रमाणे समाजाने वागायचे. बदल करायचा असला तर कॉन्फ्युशिअसच्या शिकवणीत तो बसतो असे दाखवून तो बदल करायचा ही चिनी जनतेची बौद्धिक सवय आहे.

भारतात शेकडो हजारो जाती, पोटजाती आहेत येथे व्यक्तीची आपुलकी जातीपर्यंत पोचते; भारतातले हिंदु भारत राष्ट्र ओळखत नव्हते. हिंदुधर्म हा सर्वास बंधनकारक आहे हे ओळखत नव्हते, जातीच्या पलीकडे त्यांचे क्षितिज जात नव्हते, जातीच्या पलीकडे एकदम सगुण अथवा निर्गुण असा अनंत ईश्वरच त्यांना दिसत होता.

उलट चीनमध्यें दोन हजार वर्षात तरी जाती माहित नाहीत, बौद्ध व खिस्ती या दोन्ही धर्मांचा प्रसार चीनमध्ये खूप झालेला आहे. पण या धर्माचे समाजमनावर फार थोड़े दडपण आहे. कॉन्फ्यूशिअस हा राष्ट्रीय नेता व राष्ट्रीय गुरु म्हणून दोन हजार वर्षे मानला गेला. त्याने चीन हे राष्ट्र म्हणून लोकांना सादर केले व दोन हजार वर्षांच्या इतिहासात सर्व चीनमध्ये राष्ट्रीय ऐक्याची अभेद्य जाणीव राहिली आहे.

परकीयांचा द्वेष व तिरस्कार हा चीनमधील जनतेच्या रोमारोमात भिनला आहे. शेती निकस, लोकसंख्येच्या मानाने शेतीच्या जमिनीचा तुटवडा, हे चीनचे दुखणे इतिहास सांगतच आहे. महापुरांनी लक्षावधि एकरातली शेती व वसति हजारो वर्षे वाहून जात आहे. पण अतिशय खस्ता खाऊन शेती करणे, साऱ्यासाऱ्या लोकसंख्येची विष्ठा खतासाठीं शेतीत कंपोस्ट करून घालणे, यासाठी जरूर इतके परस्परसहकार्य करणे, ओढे नद्या परस्परसहकार्याने अडवून शेतीसाठी महाकष्ठाने पाणीं मिळविणे, चरितार्थासाठीं एकवस्त्रानिशी देशत्याग करून दूरदूरच्या प्रदेशात कष्टाने व हिकमतीने वैभव संपादणे आणि शेकडो पिढ्या परदेशांत घालविल्या तरी आपला मायदेश अशा चीनची, चीनमधील आपल्या घराची, नातलगांची आठवण न विसरता स्वदेशास मदत पाठविणें हा चीनच्या लक्षावधि नागरिकांचा स्वभावच आहे.

आजही ब्रह्मदेश, सयाम, कंबोदिया, मलाया, सिंगापूर, इंडोनेशिया या सर्व देशात सुमारे दीड कोटी चिनी लोक व्यापार व उद्योगधंदे काबीज करून बसलेले असून शिल्लक धनातला काही वाटा चीनकडे, आपल्या नातलगांसाठीं ठराविक काळाने व विशेष अडचणीचे वेळी पाठवितातच.

चीन आज कम्युनिस्ट आहे याची त्याना फिकीर नाही, चीन हा चीन आहे व आपण कोठेही असलो तरी चीनची सेवा करणे आपणास प्राप्त आहे असे जगाच्या पाठीवरचा प्रत्येक चिनी मानतो. चंगीझखाना-सारख्या ज्या कोणी एकदा केव्हाही साम्राज्यविस्तार केला असेल त्याने जिंकलेला तो सारा मुलुख कायमचा चीनचा आहे व तो बलोपयोगाने परत जिंकून घेतला पाहिजे हे आग्नेय आशियात सर्वत्र पसरलेल्या चिनी माणसाचे गृहीत उद्दिष्टच आहे.

गेल्या वर्षीं चीनमध्ये उपाशी मरू लागलेल्या निर्वासितांचा लोंढा हाँगकाँगमध्ये वाहू लागला त्यातही चिनी राज्यकर्त्यांचा खोल डाव होता. आग्नेय आशियाभर पसरलेल्या चिनी लोकांनी आपल्या उपाशी बांधवांना मदत पाठवावी असा हा आक्रोशच होता व त्याचा परिणाम चीनला खूप मदत येण्यात झालाही.

वरील सर्व चित्रणात चीनचा खास ऐतिहासिक स्वभाव रेखाटला आहे. चिनी कम्युनिझमला हा स्वभाव वारसाहक्काने मिळाला व त्याला तो पोषकच आहे. कॉन्फ्यूशिअसच्या जागी माओने प्रथम मार्क्स, लेनिन, स्टालिन यांची व आता स्वतःची स्थापना केली इतकेच. चीन व भारत याच्या ऐतिहासिक स्वभावात केवढी तफावत आहे हे भारतीयांनी समजून घेतले पाहिजे. चीनची आक्रमी वृत्ती ही कम्युनिझमची प्रवृत्ति नसून ती चीनची खास प्रवृत्ति आहे असे नेहरू बोलतात त्यात पुष्कळसे सत्य आहे.

चीनच्या प्रचंड विस्तारात सामान्यतः एकच भाषा चालते हाही एक फार मोठा चमत्कार आहे. देशातल्या देशातही नेहमी स्थलांतर करण्याची परंपरा चीनमध्ये असून तिचा तो परिणाम आहे. राष्ट्र एकजूट करण्याच्या दृष्टीने कम्युनिस्टांनी काही महत्त्वाच्या सुधारणा केल्या आहेत. चीनची प्राचीन लिपी चित्रप्रधान असून तीत हजारों चित्रें आहेत. यामुळे साक्षरता प्रसाराला अडचण येते म्हणून ध्वनिदर्शक अक्षरांची नवी व अगदी थोडया अक्षराची लिपी कम्युनिस्टांच्या आधीपासून प्रसृत

होऊ लागली असून कम्युनिस्टानी तिचा खूप प्रचार चालविला आहे.

लष्करी बळावर चीनची फार भिस्त असून सैनिकांना कम्युनिझमच्या निष्ठेने भारून टाकणे हे चिनी कम्युनिझमचे मुख्य सूत्र आहे. त्यांचे राजकारण भूप्रदेशाधिष्ठित व स्वदेशातील आणि परदेशांतील चिनी लोकांच्या स्वदेशनिष्ठेवर आधारलेले असते.

म्हणून चँग के शेकला चीनमधून हाकलल्यानंतर त्यानी चीनची मुख्य भूमि निःस्पर्ध केली. नंतर तिबेट लगामात आणला आणि आता सागरी साहस न करता चीनशी सलग असणाऱ्या इंडोचीन, ब्रह्मदेश वगैरे प्रदेशांना पादाक्रांत करीत चीन पुढे सरकू पहात आहे.

चीनचा प्रदेश विस्तीर्ण असला तरी शेतीयोग्य प्रदेश दरडोई भारतांतल्यापेक्षाही कमी आहे. चीनबाहेर सर्व आग्नेय आशियात शेती मोठी, सुपीक, व लोकसंख्या थोडी असल्याने चीनची वाढती लोकसंख्या रिचविण्यासाठी चीनला हे प्रदेश हवे आहेत. शेवटी रशियाचा सैबेरियाही चीनला हवा आहे. १९५३ साली चोनची लोकसंख्या ६५ कोटि होती ती आता ७० कोटि झाली असून १९८० साली १०० कोटि होईल असा अंदाज आहे. शेती आधीच 'इंटेन्सिव्ह' म्हणजे सघन पद्धतीने केली जात असून तीत आताच दर एकरी भारताच्या दीढी दुपटीने पीक निघते. आता त्यात अधिक पीक निघू शकणार नाही व नवी जमीन शेतीला मिळत नाही.

संततिनियमनाचा प्रचार काही दिवस करण्यात आला, पण तो लोकांना समजेना, पटेना, आवडेना, म्हणून सोडून देण्यात आला असून अलीकडे चीनची आक्रमक वृत्ति वाढत आहे त्याबरोबरच वाढत्या लोकसंख्येचा गौरवही करण्यात येत आहे. चीनच्या लोकसंख्येचा हा जो संभाव्य स्फोट हाच चीनवर व जगावर मोठें संकट आणू पहात आहे. ● ●

# चिनी कम्युनिझमचे वैशिष्ट्य ☆ ☆ ☆ ५

कम्युनिस्ट चीनची अंतर्गत दु:स्थिति, उलट त्यांचे अंतर्गत सामर्थ्य व आशियातील राष्ट्रांतले चीनचे विशिष्ट स्थान इ. मुद्द्यांचे संक्षिप्त दिग्दर्शन गेल्या चार प्रकरणात केले. कम्युनिस्ट चीनची अधिक ओळख पटण्यासाठी रशियन कम्युनिझम, चिनी कम्युनिझम व जागतिक कम्युनिझम यांचे संबंध गेल्या त्रेचाळीस वर्षांत कसे होते आणि जागतिक कम्युनिस्ट चळवळ गेल्या पंचेचाळीस वर्षांत कोणत्या अवस्थांतून गेली या विषयीच्या हकीकती येथूनच्या प्रकरणांत मांडावयाच्या आहेत.

१९२० साली चीनमध्ये कम्युनिस्ट पक्ष स्थापन झाला तेव्हापासून आजतागायत माओत्से तुंग हा त्याचा पुढारी आहे. सोव्हियट युनियन कम्युनिस्ट पक्षापासून स्फूर्ति घेऊनच चिनी कम्युनिस्ट पक्ष जन्मास आला व अर्थात सुरुवातीपासून सोव्हियट युनियन कम्युनिस्ट पक्षाचे वर्चस्व व नेतृत्व चिनी कम्युनिस्टांच्या डोक्यावर बसले. पण मावत्से तुंगने ते कधीच पूर्णपणे अगर वस्तुत: मानले नाही.

पूर्व युरोपीय कम्युनिस्ट राज्ये जशी स्टालिनच्या सैन्यांनी ते ते प्रदेश व्यापल्यानंतर त्या सैन्यांनी जन्माला घातली तसे चीनचे झालेले नाही. चीनच्या कम्युनिस्ट पक्षाचा जन्म स्वतंत्रपणे झाला. तीस वर्षे यादवी व आंतरराष्ट्रीय युद्ध यांतून चिनी कम्युनिस्टांनी स्वत:च्या व स्वकीयांच्या रक्ताच्या नद्या वाहवून सारा चीन आपल्या सत्तेखाली आणला. हा पराक्रम करताना स्वत:च्या परिस्थितीअनुसार त्यांनी आपले मार्ग शोधले व यश मिळविले. या सर्व काळात रशियन कम्युनिस्टांशी चिनी कम्युनिस्टांचे सहकार्य झालेच. पण त्याचबरोबर मार्गभिन्नता, मतभेद व संघर्षही या दोन देशांच्या कम्युनिस्ट पक्षात झाले. चीन व रशिया यामधील आजचा संघर्ष ही आज जगावर परिणाम घडविणारी जी घटना घडत आहे तिचे

मूळ गेल्या त्रेचाळीस वर्षांच्या इतिहासांत आहे.

कम्युनिस्ट क्रांति ही आधुनिक उद्योगधंद्यांतील कामगारच करू शकतील हा कार्ल मार्क्सचा मूळ सिद्धांत. पण रशियात लेनिनला कम्युनिस्ट क्रांति करताना कामगारांच्या बरोबरच शेतकऱ्यांचीही मदत घ्यावी लागली. यामुळे त्याने 'कामगारांच्या नेतृत्वाखाली कामकरीशेतकरी वर्ग कम्युनिस्ट क्रांति करू शकतात' असा सिद्धांत मांडला व रशियात तशी कम्युनिस्ट क्रांति झाली. मग हाच सिद्धांत स्टालिनने चीनवर लादणे क्रमप्राप्तच होते. स्टालिन १९२४ पासून चीनच्या कम्युनिस्ट पक्षाला मार्गदर्शन करू लागला.

त्यावेळी चीनच्या प्रश्नांचा खास माहितगार असा रशियन कम्युनिस्ट पावेल मिफ याने 'चिनी शेतकऱ्यांनीही सोव्हियट संघटना स्थापाव्या,' असा आदेश दिला. पण 'त्या शेतकऱ्यांनी औद्योगिक कामगारांचे नेतृत्व पत्करले पाहिजे' ही गोष्ट मिफने आग्रहाने आदेशिली नाही. यामुळे स्टालिनने मिफला ठपका दिला. औद्योगिक शहरांत कामगार–सोव्हियटचा भक्कम पाया उभारून त्यांच्या नेतृत्त्वाखालीच चीनमध्ये कम्युनिस्ट क्रांतीचे पाऊल पुढें पडले पाहिजे आणि तसेच ते पडू शकेल हा स्टालिनचा सिद्धांत होता.

लेनिन व स्टालिन यांचा हा सिद्धांत वर म्हटल्याप्रमाणें, त्यांच्या रशियांतल्या अनुभवावर आधारलेला होता. झारच्या अमलातील रशियन सरकारची सत्ता मॉस्को आणि पीटर्सबर्ग या शहरांतील नोकरशाही, लष्करी बळ व संस्कृति यांच्या बळावरच दूरवरच्या खेड्यापाड्यापर्यंत पसरली होती. मॉस्कोपासून फार दूर असणाऱ्या ग्रामीण भागासही आसपासच्या लहान शहरांचे, बाजार व संस्कृति या दृष्टीने, आकर्षण असे आधुनिक उद्योगधंदे व संस्कृति यांचे प्राबल्यही रशियांत मॉस्को, पीटर्सबर्ग व इतर लहान मोठी शहरें यांतच पसरले होते व ग्रामीण जीवन झारच्या काळीच जास्तीत जास्त शहरावलंबी होऊ लागले होते. यामुळे मॉस्को व पीटर्सबर्ग येथील कामकरी व सैनिक यांच्या बळावर लेनिनने

झार व केरेन्स्की यांची सत्ता उलथून पाडताच सर्व रशियांतील ग्रामीण भागांतील जमिनदार व जुने सत्ताधारी वर्ग यांना शेतकऱ्यांनी उलथून पाडून लेनिनच्या हातीं सर्व सत्ता दिली. त्यामुळे शहरांतील औद्योगिक कामगारांच्या नेतृत्वाखाली कम्युनिस्ट क्रांति झाली पाहिजे हा सिद्धांत लेनिन व स्टालिन यांनी बांधला व चीनमध्ये त्याबाबत सक्ती करण्याचा आग्रह स्टालिनने धरला.

म्हणून चिनी कम्युनिस्टांनी हँको, हॅनयंग, वूचँक, नांकिंग, शांघाय ही औद्योगिक शहरे प्रथम आपल्या ताब्यांत आणावी असा स्टालिनचा आग्रह होता. चिनी कम्युनिस्ट पक्षाला केवळ स्वताच्या बळावर हे साहस झेपणार नाही म्हणून त्याने चँग कै शेकच्या क्यूमिटँग पक्षाच्या पोटांत शिरून हे कार्य करावे असे स्टालिनचे सांगणे होते. १९२४–२७ या काळात या प्रमाणे चँग कै शेक व कम्युनिस्ट यांचे सहकार्य झाले व चँग कै शेकने दक्षिणेतून सुरवात करून उत्तरेकडे क्यूमिटँगची सत्ता पसरवीत नेली. पण कम्युनिस्ट हे आज ना उद्या आपणास उलथून पाडणार हे चँगला माहित असल्याने त्याने १९२७ साली आपले हत्यार उलटवून कम्युनिस्टांच्या सर्राहा कत्तलीच केल्या. कम्युनिस्टांना कोणत्याही शहरांत थारा मिळू द्यायचा नाही या निर्धाराने त्याने अचानक हे धोरण अवलंबले व त्याला यश येऊन, शहरी कामगारांच्या नेतृत्वाखाली कामकरी-शेतकऱ्यांनी कम्युनिस्ट क्रांति करण्याच्या स्टालिनच्या सिद्धांताची वाट लागली. पण चिनी कम्युनिस्टांच्या सुदैवाने त्यांना चीनमध्ये रशियाहून मूलतः भिन्न अशी अनुकूल परिस्थिति लाभली व तीमुळे कम्युनिस्ट क्रांतीचा नवीन सिद्धांत त्यांना शोधता आला.

खरोखर एकुणिसाव्या शतकाच्या मध्यापासून परकीयांच्या स्वाऱ्यांनी आणि जागोजागच्या सेनापतींच्या महत्त्वाकांक्षेमुळें चीनमध्ये पेकिंगच्या मांच्यू राजांची सत्ता त्या राजधानीच्या शहरापासून थोडया अंतरापलीकडच्या लक्षावधि चौरस मैल प्रदेशांत सर्वत्र मोडकळीला आली होती. १९११ साली पेकिंगला मँच्यू घराणे उलथून पडले, पण नवी बलवान

सत्ता पहिल्या महायुद्धकाळात स्थापन न होता देशभर अराजकच भडकत सुटले. लहान लहान प्रदेशांची सत्ता जागोजागच्या लोभी सेनापतींनी बळकावली. यांतील पुष्कळसे चँग कै शेकला सामील झाले अथवा चँगकडून पराभूत झाले एवढाच चँग कै शेकच्या विजयाचा अर्थ होता.

मँच्यू राजांच्या अखेरच्या दिवसांत निरनिराळ्या परगण्यातले सेनानी अथवा सुभेदार हे स्वतंत्रपणे वागू लागले असल्याने पेकिंगचे प्राबल्य घटले, पण ग्रामीण जनतेच्या जीवनाशी हे सुभेदार व सेनानी कधीच एकरूप झाले नाहीत. चीनचा लक्षावधि चौरस मैल ग्रामीण प्रदेश आर्थिक अथवा सांस्कृतिक दृष्ट्या शहरावलंबी नव्हता अथवा शहराकृष्ट नव्हता. रशियाच्या अंतर्भागातही आधुनिक पाश्चात्य धर्तीची औद्योगिक शहरे जागोजाग उत्पन्न झाली होती तशी चीनमध्ये उत्पन्न झालीच नव्हती. वर उल्लेखिलेली हँकौ वगैरे मोठी शहरे पूर्व भागात व मुख्यत: किनाऱ्याशी म्हणजे परराष्ट्र व्यापाराशी संबद्ध होती. चीनमधील परंपरागत राज्यप्रकार रशियांतील राज्यप्रकाराहून वेगळा होता. रशियांत पीटर दी ग्रेटच्या काळापासून मध्यसरकारची नोकरशाही सत्ता दूरवरच्या खेड्यापाड्यापर्यंत सलग व घट्ट विणली गेली होती. जमिनदारांचे राजकीय वर्चस्व, हक्क व अधिकार नष्ट करण्याचे धोरण पीटरपासूनच्या झारनी अवलंबिले होते. उलट चीनमध्ये मांच्यू घराण्याची राज्यसत्ता तीनशे वर्षे खचतच होती व निरनिराळ्या परगण्यातले बड़े जमीनमालक, सेनापति व इतर वरिष्ठ वर्ग सरकारी अधिकाऱ्यांना आपल्या स्थानिक बलाने नमवीत असत. यामुळे चँग कै शेक मुलुखगिरी करीत दक्षिणेतून उत्तरेकडे चालला असता जिंकलेला मुलूख त्याची पाठ फिरताच त्याच्या वर्चस्वाखालून निसटत असे. आणि त्याच्या पक्षात सामील असलेले कम्युनिस्ट त्या त्या मुलुखात राहून आपला पगडा बसवीत. ही गोष्ट चँगच्या नजरेस आल्यामुळेंच चँगने कम्युनिस्टांच्या कत्तलीचे धोरण अवलंबले.

पण त्यामुळे त्याला आपली सत्ता कोठेच स्थिर व मजबूत करता आली नाही. शहरे जिंकली तरी ग्रामीण भागांत सत्ता स्थापन करता येत

नाही हा अनुभव चीनमध्ये जपानलाही आला. माओत्से तुंग चीनच्या जनतेच्या जीवनाशी पूर्ण समरस असल्यामुळे आरंभापासूनच त्याने स्टालिनचा सिद्धांत चीनमध्ये कुचकामी मानला होता. त्याच्या किंवा कोणाही चिनी कम्युनिस्टांच्या लिखाणात कामकरीनेतृत्वाचा पुरस्कार जागोजाग आहेच आणि आपण लेनिन व स्टालिन यांचेच अनुयायी आहो असे चिनी कम्युनिस्ट नेहमी सांगत आले आहेत. पण ती जागतिक कम्युनिझममध्ये वर्चस्व स्थापता यावे याकरिता केलेली पोपटपंची आहे, तिला इतिहासात आधार नाहीं.

१९२७ साली चँग के शेकने कम्युनिस्टांच्या कत्तली केल्यानंतर माओत्सेतुंग व त्याचे सहकारी यांनी दक्षिणभागात प्रतिस्पर्धी सत्ता स्थापण्याचा सात वर्षे प्रयत्न करून पाहिला. तो चँगने मोडून काढल्यावर माओत्सेतुंगने इतिहासात गाजलेली ती 'प्रदीर्घ पदयात्रा' काढली. सुमारे एक लक्ष अनुयायासह माओ प्रथम पश्चिमेकडे व नंतर वायव्येकडे सुमारे दोन वर्षे सहा हजार मैल पायी चालत गेला. त्याच्या बरोबरच्या कम्युनिस्टांनी गावोगाव मुक्काम करून शेतकऱ्यांत "जमीनमालकापासून जमिनी हिसकून घ्या आणि स्थानिक सेनापति व चँग कै शेक यांची सत्ता उलथून पाडा" असा प्रचार केला. इकडे स्टालिनचे लक्ष रशियांतील व युरोपांतील प्रश्नांनी खेचून घेतले. आणि मांच्यूरियावरील जपानी आक्रमणामुळे चँग कै शेकची शक्ति लुळी पडली होती, तरीही त्याने कम्युनिस्टांचा पाठलाग सोडला नाही. माओच्या पश्चिम यात्रेतील तीन चतुर्थांश लोक चँगच्या हल्ल्यामुळे अथवा थंडी, महापूर, उपासमार यामुळे ठार झाले. सुमारे वीस हजार कडवे कम्युनिस्ट उरले. माओत्सेतुंग, चाऊ एन् लाय, च्यूतेह व इतर आजचे शेकडो चिनी कम्युनिस्ट पुढारी गेल्या चाळीस वर्षांच्या या हालअपेष्टांच्या भट्टीतून तावून सुलाखून निघालेले आहेत.

# स्टालिनचा माओस विरोध ☆ ☆ ☆ ☆ ६

"शहरांतील औद्योगिक कामगारांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्या-कामकऱ्यांच्या संयुक्त आघाडीने त्या त्या देशांत कम्युनिस्ट क्रांति घडवून आणावी" हा लेनिन व स्टालिन यांनी रशियांतील त्यांच्या अनुभवावरून बनविलेला सिद्धांत स्टालिनने चिनी कम्युनिस्टांवर लादण्याचा प्रयत्न केला. चिनी कम्युनिस्टांनी त्या सिद्धांतास उघड विरोध केला नाही तरी पण तो कधी अमलातही आणला नाही हे गेल्या प्रकरणात दाखवले. रशियांतल्या राजकीय परिस्थितीहून चीनची राजकीय परिस्थितीच वेगळी असल्याने रशियाचा कामगारनेतृत्वाचा राजकीय सिद्धांत झुगारून देऊन खास ग्रामीण शेतकऱ्यांच्या बळावर चिनी कम्युनिस्टांचा पुढारी माओत्सेतुंग याने चीनमध्ये कम्युनिस्ट क्रांति घडवून आणली अशी माओच्या सिद्धांताची उपपत्तीही तेथे सांगितली आहे.

स्टालिन व माओ यांच्यातील हा मतभेद व व्यवहारभेद स्टालिनला चीनच्या राजकीय अंत:स्थितीची पार्श्वभूमि माहित नव्हती म्हणून आरंभीच्या काळात निर्माण झाला असेल हे शक्य आहे. पण १९२० पासून १९४९ पर्यंत चीनमध्ये कम्युनिस्टांनी स्वतंत्रपणे कधी क्रांति करूच नये असा सल्ला स्टालिनने चिनी कम्युनिस्टांना दिला, तसा नेहमी आग्रह धरला व वेळोवेळी चँग कै शेकचे लोढणे स्टालिनने चिनी कम्युनिस्टांच्या गळयात पुन: पुन: अडकविले अशी वस्तुस्थिति घडली आहे. याला मात्र स्टालिनचे चीन–विषयक अज्ञान एवढेच कारण नव्हते. कारण स्टालिनसारखा धूर्त मुत्सद्दी अशा अज्ञानात फार काळ राहणे शक्यच नव्हते.

१९२४–२७ या कालांत चँग कै शेकशी उत्तर दिग्विजयात चिनी कम्युनिस्ट सहकार्य करीत असता ग्रामीण भागांत चिनी कम्युनिस्टांची लोकप्रियता खोलवर गेली होती व त्या बळावर कम्युनिस्ट आपणास

उलथून पाडतील अशी भीति वाटूनच चँग कै शेकने कम्युनिस्टांना आपल्या सहकार्यातून हाकून लावून त्यांच्या कत्तली केल्या. पण कम्युनिस्टांनी १९२७ पासून १९३४ पर्यंत दक्षिण चीनच्या पश्चिम भागात दऱ्याखोऱ्यात आयुष्य काढून शेतकऱ्याचा सोव्हियट संघटना स्थापल्या व चँग कै शेकच्या सैन्याच्या सहा मोहिमांना मर्दुमकीने तोंड दिले.

त्या काळात शहरांचा पूर्ण अभाव असणाऱ्या विस्तीर्ण क्षेत्रात सुमारे आठ कोटि प्रजेवर माओचे कम्युनिस्ट राज्य स्थापन झाले होते ही गोष्ट स्टालिनच्या नजरेतून सुटली असणे शक्य नव्हते. पुढे चँगच्या सैन्याशी सतत लढत राहण्याने शेतकऱ्यांच्या सोव्हियट राज्यास स्थैर्य येण्याची आशा नष्ट झालेली पाहून माओत्सेतुंगने दक्षिण चीनमधील त्या सत्तेचा सरळ त्याग केला आणि आपल्या एक लक्ष अनुयायासह मागील प्रकरणात उल्लेखिलेली 'प्रदीर्घ पदयात्रा' काढून सहा हजार मैल अंतरावरच्या वायव्य भागांतल्या येनान प्रांतात माओ गेला.

दोन वर्षे चाललेल्या या पदयात्रेत ८० हजार कम्युनिस्ट मेले तरी-पण उरलेल्या २० हजारांनी दोन तीन वर्षांत चीनच्या वायव्य भागात कम्युनिस्ट राज्ये स्थापिली व सुमारे तीन वर्षात चँग–कै शेकच्या बंदुकीच्या टप्प्यापलीकडे ती स्थिर केली हे स्टालिनला दिसत होते. अर्थात चीनमध्ये खास शेतकरी संघटनेतून कम्युनिस्ट क्रांति होऊ शकली ही गोष्ट स्टालिनच्या लक्षांत आली असली पाहिजे. पण त्याने ही गोष्ट कधीच मान्य केली नाहीं व चँग कै शेकशी चिनी कम्युनिस्टांनी सहकार्य केलेच पाहिजे असा आग्रह स्टालिनने कायमच ठेवला.

१९२७ साली चँग कै शेकने चिनी कम्युनिस्टांच्या कत्तली केल्या म्हणून त्याचा निषेध करण्यासाठी स्टालिनने चँगच्या सरकारशी रशियाचे राजनैतिक संबंध तोडून टाकले होते, पण १९३२ साली चँग व माओ यांचे वैर कायम असताही स्टालिनने चँगच्या सरकारशी पुन्हा राजनैतिक संबंध जोडले. त्यावेळी जपानने मांचूरियावर आपली सत्ता स्थापन केली

होती. म्हणून स्टालिनने मांचूरियातील पूर्व चीन रेल्वेतले रशियाचे हक्क, चँगच्याही विरोधाला न जुमानता जपानला विकून टाकले.

पण १९३६ साली सिआन येथे चँग हा कम्युनिस्टांच्या हाती सापडला असता तो जपानशी युद्ध करण्याचे नाकारतो म्हणून कम्युनिस्ट बहुधा त्याला ठार मारणार होते, अशावेळी 'चँगला ताबडतोब सोडा, नाही तर रशिया चिनी कम्युनिस्ट पक्षाशी असलेले आपले सर्व संबंध तोडून टाकील' अशी धमकी स्टालीनने चिनी कम्युनिस्टांना दिली आणि चँगची सुटका करविली व जपानविरोधी युद्धात चँगशी कम्युनिस्टांनी सहकार्य केले पाहिजे असा स्टालिनने चिनी कम्युनिस्टांना पुन्हा आदेश दिला.

१९३७ साली स्टालिनने चीनच्या चँग सरकारशी अनाक्रमणाचा करार करून चीनमध्ये चँगच्या सरकारखेरीज वेगळ्या सरकारला रशिया मान्यता देणार नाही असे स्टालिनने चँगला वचन दिले. येनानमध्ये चिनी कम्युनिस्टांनी स्थापलेल्या सरकारला स्टालिनची ही स्पष्ट अमान्यताच होती. तसेच १९३७ व १९३८–३९ साली मिळून स्टालिनने चीनच्या चँग सरकारला सुमारे ३५ कोटि डॉलरची कर्जे दिली. या सर्वांचा अर्थ चीनमध्ये स्वतंत्र कम्युनिस्ट सत्ता स्थापन व्हावी हे स्टालिनला मान्य नव्हते व म्हणून त्याने त्या गोष्टीस सतत विरोध केला असाच करावा लागतो.

दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीच्या काळांत चिनी कम्युनिस्टांचे बळ वाढतच होते. पण तरीही त्या युद्धानंतर चँगच्यां सरकारशीच स्नेह ठेवण्याचे स्टालिनने ठरविले आणि १४ ऑगस्ट १९४५ रोजी चँगच्या सरकारशी रशियाचा स्नेहाचा तह झाला. त्या तहात पूर्व आशियाजवळील सागरप्रदेशांत रशियाला बऱ्याच सवलती देण्यात आल्या होत्या व मांच्युरियातील काही सवलती कायम केल्या होत्या. पण युद्धानतरच्या काळात कम्युनिस्टांचे सहकार्य चँग कै शेकला मिळाल्यावाचून चँग कै शेक हा तह अमलात आणू शकत नव्हता.

म्हणून दुसऱ्या महायुद्धानंतरच्या सर्व काळात चिनी कम्युनिस्टांनी चँगच्या सरकारशी सहकार्य करून संयुक्त सरकारच चालविले पाहिजे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ....३६९५८.... वि: ...निबंध...
क्रमांक ....१५९२.... नों दि: ...२५/८/८...



असा आग्रह अमेरिकेप्रमाणे स्टालिननेही धरला होता ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. पुढे चँग कै शेक व माओ या दोघांनी एकमेकाशी सहकार्य करण्याचे नाकारून संयुक्त सरकार अशक्य केले. अखेरीस १९४९ साली चीनमध्ये कम्युनिस्ट राज्य स्थापन जाल्यावर १९५० साली स्टालिनने माओच्या सरकारशी सख्याचा करार केला पण त्यातही मांच्यूरिआंतील रशियाचे खास हक्क-जे चँगने स्टालिनला लिहून दिले होते ते स्टालिनने माओकडूनही लिहून घेतले व माओने त्याला ते लिहून दिलेही.

या सर्व तीस वर्षांच्या काळांत माओने स्टालिनचे धोरण कधीच अमलात आणले नाही, पण उलट स्टालीनला कधी विरोधही दर्शविला नाहीं. याला विशेष कारणे होती. त्यांतले मुख्य कारण हे की स्टालिन स्वदेशांतल्या व युरोपातल्या अडचणीतून बाहेर पडून माओचे दमन करण्यास असमर्थ असल्यामुळे स्टालिनचे कोणतेही नियंत्रण आपणावर येईल ही माओला कधीच भीति वाटली नाही. म्हणून मग स्टालिनशी जाहीर भांडण करून जागतिक कम्युनिझममध्ये अंतर्गत फूट असल्याचा देखावा करण्याचे त्याने टाळले एवढेच.

चीनमध्ये माओचे कम्युनिस्ट राज्य स्वतंत्रपणे स्थापन झाल्यावर स्टालिनचे धोरण दीर्घकालपर्यंत कसे राहिले असते हे कळण्याला मार्ग नाही. चीनमधील क्रांतीनंतर साडे तीन वर्षांनी स्टालिन मरून गेला. पण त्याच्या हयातीत कोरियन युद्ध जे झाले त्याबाबत स्टालिनने घेतलेली भूमिका चिनी कम्युनिस्टाबद्दल त्याला कितीसा स्नेह होता याविषयी बराच संशय निर्माण करणारी आहे. उत्तर कोरियातील कम्युनिस्ट सरकारने १९५० च्या जूनमध्ये अमेरिकन सैन्याच्या वर्चस्वाखाली असलेल्या दक्षिण कोरियावर आक्रमण केले व तो विषय यूनोच्या सुरक्षासमितीपुढे आला. त्यावेळी रशियाने यूनोवर बहिष्कार टाकला असल्यामुळ सुरक्षा समितीत रशियाचा व्हीटो आला नाही आणि मॅकार्थरच्या नेतृत्वाखाली यूनोचे सैन्य कोरियात पाठविण्याची अमेरिकेची योजना सुरक्षा समितीत एकमताने मंजूर झाली.

त्यावेळी स्टालिनचा प्रतिनिधी न्यूयॉर्कमध्ये होता. स्टालिनच्या मनात असते तर त्याने त्याला सुरक्षा समितींत पाठवून यूनोचे सैन्य कोरियांत पाठविण्याविरुद्ध व्हीटो वापरला असता. उत्तर कोरियात रशियाचे वर्चस्व असताच उत्तर कोरियाने दक्षिण कोरियावर आक्रमण केले होते, अर्थात ते स्टालिनच्या माहितीने केले असावे. उत्तर कोरियाचे यूनोशी म्हणजे मुख्यतः अमेरिकेशी युद्ध झाल्यास अखेर त्या युद्धात चीन खेचला जाईल व त्यांत चीनच्या कम्युनिस्ट सरकारला अमेरिकेशी लढण्याचा प्रसंग येणार असल्याने त्याला आपल्या नियंत्रणाखाली आणता येईल अशी अपेक्षा बाळगून रशियाने युनो सैन्याविरुद्ध व्हीटो वापरण्याची संधि टाळली असा तर्क त्यावेळी अनेकानी केला होता.

पुढे चीन कोरियन युद्धांत आल्यानंतर रशियाची मदत चीनने घेतली, पण रशियाचे वर्चस्व पत्करले नाहीं आणि अमेरिकेला इतके हैराण केले की कोरियन युद्धाविरुद्ध अमेरिकन लोकमत भडकले. त्यावेळी मग साराच कोरिया चीनच्या भक्ष्यस्थानी पडेल अशी भीति साऱ्या जगाप्रमाणे स्टालिनलाही वाटली. म्हणून स्टालिनने नेहरूंच्या ३८ अक्षांशावर युद्ध थांबविण्याच्या सूचनेस संमति दिली. स्टालिनने त्यावेळीं सारा कोरिया चीनच्या भक्ष्यस्थानी पडू नये याचसाठी ३८ अक्षांशावरच्या तडजोडीस संमति दिली असे अनेक माहितगारांनी त्यावेळी म्हटलेही होते. स्टालिनने माओला सतत पंचवीस वर्षे असा विरोध का केला असावा ?

चीनच्या कित्येक हजार मैल सरहद्दीवर रशियाचा विरल वस्तीचा चीनपेक्षा विस्तीर्ण असा सैबेरिया पसरला आहे. या सैबेरियाला चीन धोका आणील ही भीति स्टालिनला नेहमी वाटली होती. १९३६ साली स्टालिनने औटरमंगोलियाचे स्वातंत्र्य मान्य करून त्याला चीनमधून फोडून काढले व माओशी १९५० साली करार करून मांच्यूरियात आपले हक्क कायम ठेवले. माओपासून सैबिरिया सुरक्षित राखणे हाच यांत त्याचा हेतु होता हे उघड आहे. स्टालिनच्या मृत्यूनंतर जे रूसो-चीन भांडण विशेषच पेटले आहे त्याचे बीज स्टालिनच्या सर्व

अमदानीत रुजले होते हे वरील हकीकतीवरून समजून येईल. याच मुद्याचा आणखी बोध होण्यासाठी स्टालिनचे धोरण जगातील इतर देशातल्या कम्युनिस्टासंबंधाने कसे होते हे पुढील प्रकरणांत पाहू. ● ●

# कॉमिंटर्न व स्टालिन ☆ ☆ ☆ ☆ ☆ ७

१९४३ साली दुसरे महायुद्ध चालू असता स्टालिनने कॉमिटर्न ऊर्फ कम्युनिस्ट इंटर नॅशनल ही संघटना अचानक बंद केली. त्यावेळी अनेक स्टालिनविरोधकानीही स्टालिनच्या त्या कृतीचा जयजयकार केला होता. आंतरराष्ट्रीय कम्युनिझमवर म्हणजे जगांतील अनेक राष्ट्रांतल्या कम्युनिस्ट पक्षावर स्टालिनची जी हुकुमशाही कॉमिटर्नमार्फत चाले ती यामुळे नाहीशी होईल असे या जयजयकर्त्यांना वाटले. पण कॉमिटर्न रद्द करण्यात स्टालिनचा हेतु उलटा होता.

कॉंमिटर्नमध्ये जगातील सर्व राष्ट्रातले कम्युनिस्ट पक्ष हे समान दर्जाचे आहेत असे तत्त्वतः मानले जाई. पण स्टालिनने प्रत्यक्ष व्यवहारात सोव्हिअट युनियन मधील कम्युनिस्ट पक्षाचे प्रभुत्व जागतिक कम्युनिझमच्या मानगुटीवर बसविले होते. दुसऱ्या महायुद्धाच्या आरंभी स्टालिनने हिटलरशी सख्य करून जगातील कम्युनिस्ट पक्षाना हिटलरच्या रणगाडयाला जुंपले, तेव्हां पश्चिम युरोपीय राष्ट्रांतल्या अनेक कम्युनिस्ट पक्षांत फाटाफूट झाली. पुढे हिटलरशी स्टालिनचे युद्ध सुरू झाल्यावर स्टालिनने पुनः उलटी उडी मारली. यामुळे स्टालिन हा तत्त्वशून्य व संधिसाधु हुकुमशहा असून रशियाच्या स्वार्थासाठी जगातील कम्युनिस्टांना हा गुलाम करणारा आहे असा स्टालिनचा जगात दुर्लौकिक झाला.

दुसऱ्या महायुद्धानंतर जर कॉमिन्टर्न शिल्लक राहिली असती तर

पश्चिम युरोपीय राष्ट्रांतील व नंतरच्या काळांत नवीन स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांतील कम्युनिस्टानी स्टालिनच्या संधिसाधु धोरणावर आक्षेप घेतला असता व स्टालिनचे नेतृत्व ढिले पडून आंतरराष्ट्रीय कम्युनिझममध्ये लोकशाहीप्रवृत्ति वाढू लागली असती. पण दुसऱ्या महायुद्धानंतरच्या उध्वस्त युरोपात सैन्याच्या बळावर कम्युनिझम् स्थापण्याच्या दृष्टीने अशी लोकशाहीप्रवृत्तीची कॉमिटर्न स्टालिनला अनिष्ट वाटली व म्हणून त्याने कॉमिटर्न बुडविली.

पण त्याने कॉमिटर्न बुडविली तरी जगांतील इतर राष्ट्रांतल्या कम्युनिस्ट पक्षावरचे आपले प्रभुत्व स्टालिनने सोडले नाही, ते उलट अधिकच दृढ केले. त्या कम्युनिस्ट पक्षांना मतप्रदर्शन करण्याची होती ती एकच एक संधि हिरावून घेऊन स्टालिनने त्याना रशियन परराष्ट्र-धोरणाच्या घाण्याला बैलाप्रमाणे जुंपले. आज जगातल्या कम्युनिस्टांत जी फूट पडली आहे ती रशियाचा घाणा ओढायचा की चीनचा ओढायचा एवढ्याबाबतच आहे. डांगे म्हणतात, 'भारतीय कम्युनिस्टानी रशियाचा घाणा ओढावा,' रणदिवे म्हणतात, 'चीनचा घाणा ओढावा.'

कॉमिटर्न जिवंत असती तर जगातल्या लहान व मोठ्या राष्ट्रातले कम्युनिस्ट पक्ष गेल्या वीस वर्षात फोफावलेल्या राष्ट्रवादाच्या वातावरणात अधिक राष्ट्रवादी झाले असते आणि कॉमिटर्नच्या कम्युनिस्ट पक्षांचा आज जो चीन व रशिया यांच्या भागीदारीतला जनानखाना झाला आहे व जो आज क्रूश्चेव्हच्या मालकीत संबंध जायचा की माओच्या मालकींत संबंध जायचा हा वाद माजला आहे त्या वादाचे मूळ असा हा जनानखाना कॉमिटर्नमधील मतस्वातंत्र्यामुळे निर्माणच झाला नसता. भारतातल्या कम्युनिस्ट पक्षाने रशिया व चीन यांना गेल्या दशकात आपली जी निष्ठा वाहिली व जी ते अजूनहि बदलत नाहीत ती त्यांची रशिया-चीननिष्ठा ही चीनच्या भारतावरील आक्रमणाला प्रामुख्याने कारण झाली. कारण त्या त्या देशांतले कम्युनिस्ट आपले आदेश ऐकणार नाहींत, आपापल्या राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीनेच वागतील असे स्टालिन व माओ या दोघांना वाटले

असते तर त्यांना आक्रमणाचा मोह कधी पडलाच नसता. यापुढे येथल्या कम्युनिस्टांनी आपली निष्ठा भारतात परत आणणे व स्वताला राष्ट्रीय कम्युनिस्ट म्हणवून घेणे हाच चीनचे आक्रमण मागे हटविण्याचा महत्त्वाचा उपाय आहे.

कम्युनिस्ट इंटरनॅशनल ऊर्फ कॉमिटर्न ही संघटना रशियन राज्य-क्रांतीनंतर स्थापन झाली. तिचे बीज १९१५ साली पहिले महायुद्ध चालू असता स्वित्सर्लंडमध्ये झिमरवॉल्ड येथे जो आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट गट क्रांतीच्या संधीसाठी दबा धरून राहिला होता त्यात होते. महायुद्ध थांबवावे व निरनिराळ्या राष्ट्रातल्या कम्युनिस्टांनी आपापल्या देशात कम्युनिस्ट क्रांति करावी अशी सर्वसामान्य भूमिका या झिमरवॉल्ड गटाची होती. यांतील रशियन कम्युनिस्टांना रशियांत कम्युनिस्ट क्रांति करण्यात व रशियापुरते युद्ध थांबविण्यात यश आले. यामुळे सोव्हिअट यूनिअन कम्युनिस्ट पक्षाकडे आपोआपच कॉमिटर्नचे नेतृत्व आले आणि रशियाची क्रांतिपद्धति हीच जगातील कम्युनिस्ट राष्ट्रांपुढे आदर्श म्हणून मांडण्यात आली. कॉमिटर्नच्या अनेक सभासदांना हे पसंत नव्हते. रशियातील क्रांति-पद्धति त्या देशांतल्या परिस्थितीला अनुरूप अशी ठरली, अर्थात इतर देशाना अनुरूप अशी पद्धति त्या त्या देशातल्या कम्युनिस्टांनी स्वीकारावी आणि कॉमिटर्नचे काम अमुक एका राष्ट्राचे वर्चस्व न स्थापता पूर्ण समतेने व लोकशाही मार्गाने चालावे असा मूळचा संकेत होता.

पण पहिल्या महायुद्धानंतरच्या काळात रशियाबाहेर कोठेच कम्यु-निस्ट क्रांति झाली नाही व त्या त्या देशातल्या कम्युनिस्टांना जनतेचाच विरोध होऊन हंगेरी, जर्मनी वगैरे देशातले कम्युनिस्ट पक्ष लोकांनीच ठेचून टाकले. यामुळे पुष्कळ देशातल्या कम्युनिस्ट पक्षांना भुईखाली जाऊन जगण्याची, उपासमार काढण्याची पाळी आली. म्हणून कॉमिटर्नची कचेरी मॉस्कोत ठेवावी लागून जगातील कम्युनिस्टांना मॉस्कोच्या फंडावर जगावे लागले व मग अर्थातच जगातले हे कम्युनिस्ट पक्ष मॉस्कोचे मिंधे होऊन त्यांना मॉस्कोचे आदेश शिरसावंद्य मानावे लागले.

कॉमिटर्नमधील महत्त्वाच्या अधिकारपदावर रशियन कम्युनिस्टांचीच स्थापना होई. हे अधिकारी पहिल्या दर्जाचे कम्युनिस्ट नसत. उच्च दर्जाची माणसे रशियन सरकारात गेल्यामुळे कमी दर्जाची व अर्ध्या हळकुंडाने पिवळी होणारी हुकुमशाही प्रवृत्तीची रशियन माणसे कॉमिटर्न–मध्यें उच्च अधिकारपदावर येऊ लागली व त्यांनी रशियनेतर सभासदांचे मतस्वातंत्र्य बहुतेक संपुष्टात आणले. १९२२ साली कॉमिटर्नची चौथी जागतिक परिषद भरली. तिला लेनिन हजर होता. तो हजर असल्याची ती शेवटचीच परिषद. त्या परिषदेत पास झालेला ठराव हा रशियांतील परिस्थितीवरच बव्हंशी आधारलेला असल्याने "इतर राष्ट्रांच्या परिस्थि–तीत त्याचा काहीही उपयोग होणार नाहीं" अशी टीका त्या ठरावावर स्वतः लेनिनने तेथल्या तेथेच केली होती.

आश्चर्य वाटते ते हे की सरदेसाई–डांगे वगैरे भारतीय कम्युनिस्टांनीं लेनिनचे त्यावेळचे ते भाषण अभ्यासिले असले पाहिजे. पण त्यानंतरच्या चाळीस वर्षांत स्टालिनने रशियाच्या हिताच्या दृष्टीने जे जे आदेश या कम्युनिस्टांना दिले ते ते यांनी आपापल्या देशाचे अहित करून सुद्धा पाळले व अजून त्या गुलामगिरीची मगरमिठी त्यांना सोडवून घेता येत नाही.

लेनिन पुढील काळात जिवंत राहिला असता तर त्याने कॉमिटर्नमध्यें लोकशाही टिकविण्याचा आग्रह धरला असता की काय याविषयी निश्चित काही सांगता येत नाही, पण स्टालिनच्या मनात लेनिनची पापभिरुता औषधालाही नव्हती. १९२५ च्या आरंभी लेनिन मेल्यावर रशियन सरकारांत, रशियन जनतेत व कॉमिटर्नमध्ये आपणास कोणीही प्रतिस्पर्धी राहू नये या दिशेने त्याने आपली धोरणे आखून सर्व प्रतिस्पर्ध्यांची वाट लावली व हळूहळू वरील तिन्ही क्षेत्रांत तो स्वतः हुकुमशहा झाला. युरोपात कम्युनिस्ट क्रांत्या घडवून आणण्याचे धोरण फसले तेव्हा त्याने जागतिक क्रांतीच्या सिद्धांताला मूठमाती दिली व 'एकेका देशात सोशॅलिझम्' हे नवे धोरण पुरस्कारले.

वरवर पाहतां हे धोरण सरळच होते. रशियन कम्युनिस्ट हे जागतिक कम्युनिस्ट आहेत ही त्यांची भूमिका यामुळे नष्ट झाली आणि ते 'राष्ट्रीय कम्युनिस्ट' झाले. अर्थात असेच 'राष्ट्रीय कम्युनिस्ट' इतर राष्ट्रातल्या कम्युनिस्टांनीही व्हावे असा आदेश स्टालिनने जगांतील इतर राष्ट्रांतल्या कम्युनिस्टांना दिला असता तर तो प्रामाणिकपणाचा ठरला असता. पण येथूनच स्टालिनचा साम्राज्यवाद सुरू झाला आणि त्यासाठीं रशियाबाहेरच्या राष्ट्रातल्या कम्युनिस्टांना त्याने रशियन हिताच्या बटकी बनविले. अशी बटकीची भूमिका जगांतील राष्ट्रांतल्या कम्युनिस्टांनी राजीखुषीने घेतली हे त्यांतले मोठे आश्चर्य व दुर्दैव होते. स्टालिनच्या या धोरणाने जगातील कम्युनिस्टांची अब्रू हिटलरच्या काळी अगदी उध्वस्थ करून टाकली.

स्टालिनने जागतिक कम्युनिस्टाकरवी सतत १९३२-३३ पासून सहा वर्षे हिटलर विरोधीमोहीम काढली होती. पण १९३९ च्या ऑगस्टच्या २४ तारखेस हिटलर-स्टालिन सख्य होताच जागतिक कम्युनिस्टांनी हिटलरला शिव्या देण्याचे बंद करून त्या साऱ्या शिव्या ते पश्चिमी राष्ट्रांना देऊ लागले. पुढे ११ जून १९४१ रोजी हिटलरने रशियावर हल्ला करताच अँग्लो-अमेरिकनांचे 'हिटलरविरोधी साम्राज्यशाही युद्ध' हे स्टालिनच्या हुकुमाने लगेच 'लोकयुद्ध' झाले आणि जगांतील कम्युनिस्ट तशी पोपटपंची करूं लागले.

दुसऱ्या महायुद्धाशेवटी पूर्व युरोपांतील राष्ट्रात स्टालिनने आपली सैन्ये घालून तेथे कम्युनिस्ट क्रांत्या घडवून आणल्या. पण आपल्या हुकुमतीबाहेर कम्युनिस्ट क्रांति होण्याला स्टालिनने विरोधच केला. टिटोशी स्टालिनचे भांडण यामुळेच झाले. चिनी कम्युनिस्टांच्या स्वतंत्र क्रांतीस स्टालिनने सतत तीन वर्षे याच हेतूने विरोध कसा केला याची कथा गेल्या प्रकरणांत दिली आहे.

पण चिनी कम्युनिस्ट पुढारी माओत्सेतुंग याचा स्टालिनशी तात्विक झगडा नाही. "स्टालिनच्या हुकुमाखाली रशियाच्या हिताच्या दृष्टीने

जगातील कम्युनिस्टानी गुलामगिरीने वागावे" असे स्टालिनचे मत होते. तसेच "स्टालिन मेल्यानंतर आता माओच्या हुकुमाखाली चीनच्या हिताच्या दृष्टीने जागतिक कम्युनिस्टानी गुलामगिरीने वागावे"असे माओचे मत आहे. स्टालिनच्या साम्राज्यवादाच्या जागी माओचा साम्राज्यवाद हवा असे माओचे मत आहे. त्यामुळे चिनी साम्राज्यवादाचा धोका आशियावर फार वाढला आहे. आशियातील कम्युनिस्टानी राष्ट्रवादी बनून त्यास प्रतिकार करणे हाच येथे उपाय आहे. ● ●

## स्टालिन, माओ व क्रूशॉव्ह ☆ ☆ ☆ ☆ ८

जगांतल्या कोणत्याही राष्ट्रातला कम्युनिस्ट पक्ष सोव्हियट रशियामधील कम्युनिस्ट पक्षापेक्षा अधिक बलवान होऊ नये, जगातल्या कम्युनिस्ट पक्षांनी सोव्हियट रशियातील कम्युनिस्ट पक्षाचे मिंधे रहावे, सोव्हियट युनियन मधील कम्युनिस्ट पक्षाने जगातल्या कम्युनिस्ट पक्षावर हुकुमत गाजवून त्यांना रशियाचे हित साधेल अशा प्रकारे जरूर तर देशद्रोही धोरणे आखण्यासही भाग पाडावे, ही भूमिका स्टालिनने आयुष्यभर अमलात आणली. याच हेतूसाठी स्वतंत्र कम्युनिस्ट राज्य रशियाबाहेर कोठेही होऊ नये अशी स्टालिनची विचारसरणी होती.

म्हणून चीनच्या माओत्सेतुंगला स्टालिनने 'अमुक प्रकारेच तू क्रांति केली पाहिजेस, चँग के शेकशी सहकार्य करूनच तूं राज्य स्थापन केले पाहिजेस', इत्यादि दंडक घातले. माओने हे दंडक कधीच मानले नाहीत. अखेरीस स्टालिनच्या नाकावर टिच्चून त्याने चीनमध्ये स्वतंत्र कम्युनिस्ट राज्यही स्थापले. पण माओत्सेतुंगने स्टालिनला जाहीर विरोध कधीच केला नाही. कारण सर्वात बलाढ्य अशा कम्युनिस्ट राज्याच्या

व त्या राज्यातील कम्युनिस्ट पक्षाच्या हुकुमतीत बाकीच्या राष्ट्रातील कम्युनिस्ट पक्षानी वागून प्रसंगी मध्यवर्ती कम्युनिस्ट राष्ट्राच्या हितासाठीं देशद्रोहही केला पाहिजे हे स्टालिनचे तत्त्व माओला चिनी कम्युनिस्ट राज्यासाठी हवे होते.

अखेर चिनी कम्युनिस्ट राज्य हेच रशियापेक्षाही मोठे, महत्त्वाचे व बलशाली होणार हे माओ जाणून होता आणि चीनमध्ये स्वतंत्र कम्युनिस्ट क्रांति करण्यात त्याला यश आल्यामुळे हळू हळू स्टालिनचे जागतिक स्थान स्वतःला मिळविण्याची तयारी माओ करीत होता.

उलट स्टालिनला दुहेरी अपयश आले. चीन त्याच्या हातून निसटलाच, पण पूर्व युरोपीय राष्ट्रात त्याने कम्युनिस्ट सैन्ये घालून आपली अंकित अशी कम्युनिस्ट राज्ये स्थापन केली तरी पश्चिम युरोपात अमेरिका आपणास शिरकाव करू देत नाहीं हा फार अनपेक्षित असा अनुभव स्टालिनला आला. युद्धानंतर अमेरिकेनें युरोपांतून सैन्ये व शस्त्रास्त्रे परत नेली तेव्हां आर्थिक दृष्टया उध्वस्त झालेला पश्चिम युरोप आपल्या घशात चालून येईल असे स्टालिनला वाटले होते. पण अमेरिकेने नाटो संघटना व मार्शल योजना या अनुक्रमे लष्करी व आर्थिक तरतूदी निर्मून स्टालिनचा अंदाज खोटा पाडला.

अमेरिकन भांडवलशाही आर्थिक अनर्थांत सापडेल व पश्चिम युरोपात आपणास कम्युनिझम माजविता येईल असे स्टालिनला वाटले होते. तेही खोटे ठरले. ग्रीसमधील कम्युनिस्ट बंडातून स्टालिनला माघार घ्यावी लागली. स्टालिनने बर्लिनची कोंडी करण्याचा प्रयत्न केला, पण त्यात आपण हट्टाला पेटलो तर अमेरिका पुनः युद्धाला तयार होईल इतके अमेरिकन लोकमत ताठ बनल्याचे त्याला आढळले व स्टालिनने बर्लिनची कोंडी उठविली. कोरियांत चीन व अमेरिका यांचे युद्ध जुंपावे असा त्याचा हेतू होता. पण त्यामुळे सारा आशिया चीनच्या घशात जाईल अशी भीति पुढे स्टोलिनलाच वाटून शेवटी कोरिअन युद्ध थांबविण्यात स्टालिनला पुढाकार घ्यावा लागला.

स्टालिनचे डाव असे सर्व बाजूनी उलटत असता युगोस्लाव्हिआत टिटोने स्वतंत्र कम्युनिस्ट राज्य स्थापून स्टालिनचे आदेश मानण्याचे नाकारले. यामुळे स्टालिनने पंचवीस वर्षे खपून उभारलेल्या जागतिक कम्युनिस्ट तटबंदीस खिंडार पडले व आता ती ढासळू लागणार हे भवितव्य स्टालिनला दिसू लागले. या परिस्थितीत स्टालिन मेला. त्याचे मागून क्रुश्शोव्हला जागतिक कम्युनिझमचे धोरण आमूलाग्र बदलावे लागले.

रशियन जनतेची आर्थिक परिस्थिति सुधारली होती व आता युद्ध अथवा जागतिक कम्युनिस्ट क्रांतीची साहसे न करता रशियाने शांततेचे धोरण अवलंबून पश्चिमी राष्ट्राशी सहजीवनाच्या धोरणाने नांदावे असे रशियन लोकमत बनले आहे हे क्रुश्शॉव्हला दिसले. अॅटॉमिक युद्धाने सर्वनाशच होणार हे त्याच्या लक्षात आले. म्हणून जागतिक शांततेचे नवे धोरण आखून त्या धोरणात जागतिक कम्युनिझमला खेचण्याचा प्रयत्न त्याने सुरू केला. आणि त्याबरोबर चीनशी क्रुश्शॉव्हचे भांडण सुरू झाले.

स्टालिनर्निदेचे धोरण क्रुशॉव्हने जे अवलंबले ते रूसो-चीनी भांडणाचे मूळ होय असे मानले जाते. क्रुशॉव्ह हा दयाळू, लोकशाहीवादी व शांततावादी आहे म्हणून तो स्टालिनर्निदक झाला व त्याने स्टालिनची धोरणे उलटविली असे सांगण्यात येते. स्टालिन व क्रुशॉव्ह यांच्या स्वभावात असा फरक असेलही. पण स्टालिनच्या तीस वर्षांच्या हत्याकांडात क्रुशॉव्ह त्याचा हस्तकच होता आणि हंगेरीतील बंड मोडण्यासाठी त्याने पंचवीस हजार माणसे रणगाड्याखाली घालून मारली, हे लक्षात घेतले म्हणजे क्रुशॉव्हचा स्वभाव कसा आहे हा मुद्दा निरुपयोगी ठरतो.

शांततेचे व सहजीवनाचे धोरण क्रुशॉव्हला वर सांगितलेल्या वास्तव परिस्थितीने स्वीकारायला लावले आणि रशियात सर्व प्रतिस्पर्ध्यांना बाजूला सारून त्याला स्वत:चे नेतृत्व स्थापायचे होते म्हणून त्याने स्टालिनचा

मूर्तिभंग केला हे उघड होते. पुढे माओचे क्रुशॉव्हशी जे भांडण जुंपले त्याला त्या दोघांचा स्टालिनविषयक मतभेद हे निव्वळ निमित्त होते.

क्रुशॉव्हने अमेरिकेशी सहजीवन पत्करले आणि त्याबरोबरच आशियात भारताची प्रतिष्ठा वाढविण्याचे धोरण पत्करले हे क्रुशॉव्ह व माओ याच्या भांडणाचे दुहेरी कारण आहे. अमेरिकेशी क्रुशॉव्हने सहजीवन पत्करले असते पण आशिया-आफ्रिका यांतील राजकारणात हात घातला नसता तर माओ संतापला नसताही कारण अमेरिका आशियाच्या भूमीवर हतबल असून भारतातली लोकशाही ढिली दुबळी असल्याने फणस कापून गरे खावे त्याप्रमाणे आशिया तुकडयातुकडयानी खाऊन टाकण्याचा डाव माओने योजला होता.

अमेरिका चीनशी युद्ध करील तर रशिया अमेरिकेला अ‍ॅटॉमिक युद्धात खेचील असा अमेरिकेला रशियाचा धाक आहे एवढी रशियाची मदत माओला पुरे होती. आणि रूसो-अमेरिकन अ‍ॅटॉमिक युद्ध झालेच तर ते दोन्ही उद्योगप्रधान देश, तसेच इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, जपान हे सर्व उद्योगसंपन्न देश उध्वस्त होऊन त्या मानाने चीनचा व बाकीच्या आशियाचा विध्वंस कमी होणार असल्याने सारा आशिया व बाकीचे उध्वस्त जग आपल्या ओंजळीत येईल असे सुखस्वप्न माओ अनुभवीत होता.

पण चीनने आशिया खाणे हे रशियाला प्राणसंकट होते. म्हणून भारताला चीनचा प्रतिस्पर्धी करण्यासाठी क्रुशॉव्हने नेहरूंना पाठबळ देऊन भारताची प्रतिष्ठा आशियात वाढविण्याचा उद्योग सुरु केला. कोरिया, इंडोचीन व लाओस या सर्व प्रकरणी रशियाने नेहरूशी सहकार्य करून चीनला पायबंद घातला, भारताला अमेरिकेची मदत मिळत असताही रशियाने भारतात पोलाद कारखाना काढून, व इतर अनेक प्रकारे, भारताला मदत केली आणि उलट चीनचे शेतीचे व उद्योग-धंद्यांचे नियोजन फसत चालले असता रशियाने चीनला, पूर्वी कित्येक वर्षे चालू ठेवलेली मदत एकदम तोडली, यामुळे माओ चिडला.

चीनचे वैभव व वर्चस्व आशियात वाढणे हे क्रुशॉव्हला सहन होत नाही व भारताला आशियात चीनचा जबरदस्त प्रतिस्पर्धी करण्याचा जो अमेरिकेचा प्रयन्त आहे त्या प्रयत्नात क्रुशॉव्ह अमेरिकेशी सहकार्य करीत आहे अशी माओची खात्री झाली. यामुळे माओ क्रुशॉव्हशी भांडू लागला.

आपण लेनिन व स्टालिन यांचे धोरण चालवितो आणि क्रुशॉव्ह लेनिनिझमपासून च्युत झाला हा माओचा कांगावा निव्वळ थोतांड आहे. माओने स्टालिनचा आदेश अथवा सिद्धांत कधीच पाळला नाही. पण कम्युनिस्ट रशियाने आशियात कम्युनिस्ट चीनला नंगा नाच घालण्याला मदत करावी त्याऐवजी नेहरूंची व भारताची प्रतिष्ठा आशियात वाढवून चीनला पायबंद घालण्यासाठी क्रुशॉव्ह नेहरूंशी सहकार्य करतो ही गोष्ट माओला झोंबली आणि भारताचा 'हिंदीचिनी भाईभाई' हा प्रचार मायावीपणाचा आहे असा संशय माओला आला.

हे सारे स्वाभाविक झाले आहे. क्रुशॉव्ह व माओ यांच्या भांडणाचे बीज क्रुशॉव्हनी नेहरूंना बलवर्धनासाठीं व प्रतिष्ठावर्धनासाठी मदत केली यात आहे हा मुद्दा येथे महत्वाचा आहे. ● ●

# माओ, भारत व आशिया ☆ ☆ ☆ ☆ ९

जगाची फाळणी भांडवलशाही–साम्राज्यशाही राष्ट्रे आणि कम्युनिस्ट राष्ट्रे अशी अगदी कापीव कातीव झाली पाहिजे, असे अमेरिकेत जसे एक एकान्तिक मत बरेच प्रभावी आहे, तसेच दुसऱ्या टोकाला चीनचे मत आहे. याचा अर्थ हे भांडण संपविण्यासाठीं ॲटॉमिक युद्धाचे साहस ओढवून घ्यावे असे चीनचे मत आहे असा नव्हे. पण भांडवलशाही राष्ट्राबाबत जगात विद्वेष माजवावा, भारतासारखी जी राष्ट्रे दोन्ही

गटात सामील होत नाहीत त्यांना या ना त्या गटात सामील होणे भाग पाडावे आणि जी लोकशाही सरकारे ॲटॉमिक युद्धाचा धाक घालतात त्यानाच ॲटॉमिक युद्धाच्या संभवाने घाबरवून टाकून त्यांच्याबद्दल मागासलेल्या राष्ट्रांत उपहासबुद्धि निर्माण करावी असे चीनचे म्हणणे आहे.

लोकशाही राष्ट्रात जाहीरपणे नाचणारा छचोरपणा, जाहीरपणे व्यक्त होणारे त्यांचे मतभेद आणि त्यांची अफाट श्रीमंती याबद्दल मागासलेल्या राष्ट्रांत द्वेष, मत्सर, तिरस्कार, उपहासवृत्ति वगैरे भावना सतत नांदत असतात. उलट कम्युनिस्ट राष्ट्रातली अंतर्गत एकजूट, त्यांचे कठोर शिस्तीचे व क्रूर वर्तन, दारिद्र्यातहि कष्ट सोसून आर्थिक सामर्थ्य वाढविण्याचा त्यांचा निर्धार आणि थोडयाही निमित्ताने कार्यक्षम आक्रमण करण्याची कम्युनिस्ट राष्ट्रांची तयारी, यांबद्दल मागासलेल्या राष्ट्रांना दरारा, भीति व आदर वाटतो.

याचा जास्तीत जास्त फायदा घेऊन व त्वरा करून आशिया, आफ्रिका व लॅटिन अमेरिका यातून पश्चिमी राष्ट्रांना हुसकून लावावे व त्यात कम्युनिस्टांचे वर्चस्व स्थापावे असे चीनचे मत आहे. रशियाला हे साहस करायचे नसले तर त्याने स्वस्थ बसावे पण चीनच्या आकांक्षेस व धोरणास विरोध न करता चीनला हे साहस करू देऊन फक्त आपल्या ॲटॉमिक शस्त्रांचा पाठिंबा चीनच्या पाठीशी ठेवावा अशी चीनची रशियाला सूचना आहे.

"आम्ही दूरच्या रणनीतीच्या दृष्टीने पश्चिमी राष्ट्रांबद्दल तिरस्कार व विद्वेष माजविणार आणि नजिकच्या रणनीतीच्या दृष्टीने पश्चिमी राष्ट्राशी जपून वागणार" असे चिनी कम्युनिस्ट आपल्या धोरणाचे सूत्र म्हणून सांगतात व रशियाचे धोरण नेमके याबाबत चुकते कसे हे ते पुढीलप्रमाणे दाखवितात.

"क्यूबामध्ये रशियाने ॲटॉमिक अस्त्रे गुप्तपणें नेऊन ठेवली. पण ॲटॉमिक युद्धाचे आव्हान आल्यास ते स्वीकारण्याची धमक रशियात नव्हती, यावरून नजिकच्या राजकारणात क्रुश्शॉव्हने सावधपणाऐवजी

साहसबाजी केली आणि ॲटॉमिक युद्धाचे आव्हान केनेडीने देताच क्रुश्चॉव्हने पळ काढून जगात दूरच्या धोरणाच्या दृष्टीने केनेडीबद्दल आदर व दरारा वाढविला," अशी कम्युनिस्ट चीनची क्युबा प्रकरणावर टीका आहे.

यामुळे चिनी कम्युनिस्टानी क्रुश्चॉव्हला 'कॅपिच्युलेशनिस्ट' म्हणजे 'कचखाऊ' हे विशेषण लावून त्याची वृत्तपत्रात व रेडिओवर सतत कित्येक आठवडे निंदा चालविलीं आहे. उलट चीनचे धोरण वर दिलेल्या सूत्राप्रमाणे सुयोग्य कसे आहे याचे उदाहरण चिनी कम्युनिस्टांचे पाठीराखे सांगतात ते असेः—

"भारतावर अचानक बलवान व यशस्वी आक्रमण करून आणि अँग्लो-अमेरिकनापुढे भारताला मदतीच्या याचनेसाठी लोटांगण घालायला लावून भारताला उगीचच मिळालेली प्रतिष्ठा चीनने उतरविली, चीनशी लढण्यासाठीं आशियातील रणांगणात स्वतः उतरण्याचे धैर्य अँग्लो-अमेरिकनात नाही हेही चीनने सिद्ध करून अँग्लो-अमेरिकनाबद्दल आशियातील राष्ट्रांत अनादर उत्पन्न केला. पाकिस्तानात अमेरिका व भारत याबद्दल अनादर व तिरस्कार माजविला, आशियातील राष्ट्रांत चीनबद्दल दरारा व भीति उत्पन्न केली, हे दूरदृष्टीच्या राजकारणाचे चीनचे यश असून हिमालयातून सैन्य मागे घेण्याने चीनने ॲटॉमिक युद्ध टाळले व नजिकच्या राजकारणात सावधगिरी दाखविली," असे लाल चीन फुशारकीने सांगतो आहे.

चीनने अशा प्रकारे राजनीतिकौशल्य व रणशौर्यही दाखविले आणि क्यूबा व हिमालय या एकसमयावच्छेदेकरून घडून आलेल्या घटनानी रशियाचा कचखाऊ उल्लूपणा आणि चीनचे दमदार शौर्य व दूरदृष्टि दिसून आली, असा चीनच्या पक्षपात्यांचा क्यूबा व हिमालय या घटनाबाबतचा दृष्टिकोन आहे.

क्यूबा व हिमालय या प्रकरणानी चीन व रशिया यामधील दुही मात्र परिपूर्ण झाली आहे. "रशियाला यापुढे पश्चिमी राष्ट्राशी हाडवैराने वागायचे नसले तर वागू नये, भारतासारख्या तटस्थ राहू पाह-

णाऱ्या दुबळ्या राष्ट्रास तिरस्कारून कोणत्या तरी गटाची गुलामगिरी पत्करण्यास भाग पाडायचे नसले तर रशियाने निदान भारताबाबत तटस्थ राहावे आणि आपले अॅटॉमिक अस्त्र चीनच्या मदतीसाठी नेहमी सज्ज ठेवून चीनच्या हाती जागतिक कम्युनिझमचे नेतृत्व सोपवावे व त्याला आपल्या जागतिक कारवाया करू द्याव्या" अशी आता चीनच्या पक्ष-पात्यांची मागणी आहे.

पण रशियाने भारताबद्दल जाहीर आपुलकी दाखवून व भारतास पश्चिमी मदत मिळत असताही तिकडे दुर्लक्ष करून 'चीनला मागास-लेल्या राष्ट्रात नंगानाच घालण्यास आपण मुभा देणार नाहीं असेच आपले मनोगत स्पष्ट केले आहे. इंडोनेशियाला आग्नेय आशियात सागरी रणनीतीच्या दृष्टीने फार महत्व आहे. त्या देशावर प्रभुत्व मिळ-विण्याच्या दृष्टीनेही रशिया व चीन यांचे दरम्यान सध्या झटापट चालू आहे. चीन व रशिया यांचे आशियाबाबतचे हे भांडण मिटत नसून विकोपास चालले असल्याने दोघांचेही आशियातील वर्चस्व घटू लागले आहे.

जगांतील कम्युनिस्ट पक्षांत चीनवादी व रशियावादी अशा फळ्या पडल्या असून युरोपअमेरिकेतील कम्युनिस्ट पक्ष रशियावादी व आशियां-तील कम्युनिस्ट पक्ष चीनवादी आहेत असे वरवर पाहता दिसते. पण वस्तुस्थिति बरीच वेगळी आहे. पश्चिमी राष्ट्रातले कम्युनिस्ट पक्ष जुने असून त्या राष्ट्रांना युद्ध नको असल्याने त्या राष्ट्रातले कम्युनिस्ट पक्ष रशियावादी आहेत पण त्यातले तरुण सदस्य रशियावादी नाहीत. आणि युरोप अमेरिकेतले कम्युनिस्ट पक्ष रशियन वर्चस्वाखालून आपापले कृति-स्वातंत्र्य मिळवू पहात आहेत.

पूर्व युरोपीयन कम्युनिस्ट राष्ट्रात रशियाची सैन्यें असूनही त्या राष्ट्रातले कम्युनिस्ट पक्ष रशियापासून कृतिस्वातंत्र्य मागत आहेत म्हणूनच पूर्व युरोपात टिटोचे नैतिक वजन वाढत असून क्रूश्चॉव्हला टिटोशी मिळते घ्यावे लागत आहे. स्टालिनची जागा आपण घेऊन जागतिक

कम्युनिझम्‌चा लगाम आपल्या हाती घ्यावा अशी माओची महत्त्वाकांक्षा होती. पण माओ व क्रूश्शॉव्ह यांच्या भांडणात कम्युनिझम्‌चे मध्यवर्ती नेतृत्व खिळखिळे झाले याची माओला चीड आली असून क्रूश्शॉव्हने भारताची कड घेऊन आपल्या शेपटीवर पाय दिला, चीन–रशिया भांडण चव्हाट्यावर आणले व मध्यवर्ती कम्युनिस्ट नेतृत्व खिळखिळे करून जगातल्या कम्युनिस्ट पक्षात फुटीरपणा वाढण्याला क्रूश्शॉव्ह कारण झाला असे माओचे म्हणणे आहे. क्रूश्शॉव्हच्या स्टालिनर्निदेचा हा मोठा दुष्परिणाम आहे असे माओ म्हणतो.

आशियांतील कम्युनिस्ट पक्षांनी या वादात माओची बाजू घेतल्या–सारखी दिसते. क्रूश्शॉव्हने केलेल्या स्टालिनर्निदेचा व टिटोशी केलेल्या सख्याचा उत्तर कोरिया, उत्तर व्हिएतनाम, थायलंड, इंडोनेशिया वगैरे देशातील कम्युनिस्ट पक्षांनी निषेध केला असून क्यूबाप्रकरणी कम्युनिस्ट चीनने रशियाच्या धोरणावर केलेले जे भाष्य वर दिले आहे त्याची इंडोनेशियन कम्युनिस्ट पुढारी ऐडित याने 'री' ओढली आहे.

जपान व ब्रह्मदेश यातील कम्युनिस्ट पक्ष अगदी लहान आहेत. पण ते रशियावादी नसून चीनचीच बाजू घेतात. सिलोनचा कम्युनिस्ट पक्ष अगदी दुबळा व लहान आहे, तो मात्र चीनवादी नसून रशियावादी आहे. भारतीय कम्युनिस्टांना क्रूश्शॉव्हने केलेली स्टालिनर्निदा सर्वथैव पसंत आहे असे नव्हे. पण लडाखमध्ये चीनने आक्रमण केले याबद्दल क्रूश्शॉव्हने १९५९ साली खाजगी रीतीने नापसंती व्यक्त केली व तेव्हापासून भारतीय कम्युनिस्टांचे पुढारी अजय घोष यांनी चीनवर आक्रमक प्रवृत्तीचा जाहीर आरोप करून चीनशी भांडण सुरू केले. तेव्हां-पासूनच भारतीय कम्युनिस्टात चीनवादी व रशियावादी असे गट झाले.

अजय घोष १९६२ च्या जानेवारीत वारले. त्यापूर्वीच चीनच्या कम्युनिस्टांनी ते प्रतिगामी आहेत असा जाहीर प्रचार त्याचे विरुद्ध सुरू केला होता. भारतीय कम्युनिस्टात ही फितुरी क्रूश्शॉव्हने माजविली असे माओचे म्हणणे आहे. अजय घोष यांची भूमिका आता डांगे यांनी घेतली

आहे. तथापि पश्चिम बंगालचे कम्युनिस्ट व रणदिवे वगैरे इतर प्रांतातले पुढारी अजून चीनवादीच आहेत. पण आशियातील कम्युनिस्टांचे मुख्य धोरणही आहे ते मध्यवर्ती कम्युनिस्ट सत्ता ढिली पाडून आपले स्वातंत्र्य मिळविण हेच आहे.

या बाबतीत भारतीय कम्युनिस्टच अजून मागस आहेत. त्यांपैकी एका गटाला रशियानिष्ठा हवी आहे तर दुसऱ्या गटाला चीननिष्ठा हवी आहे. पण आशियातील इतर राष्ट्रातले कम्युनिस्ट आपापल्या राष्ट्रीय स्वार्थामागे लागले आहेत. कम्युनिस्ट राष्ट्रे व पश्चिमी राष्ट्रे या दोघांबद्दल आलटून पालटून स्नेह दाखवून दोघांकडून मदत मिळविण्याचे इंडोनेशियाच्या सोकार्नोचे धोरण आहे. त्याच्याशी तेथला कम्युनिस्ट पुढारी ऐडित हा मूक सहकार्य करतो व सुकार्नोच्या अनियंत्रित हुकुमशाहीला बिनशर्त पाठिंबा देतो. भारत व चीन यांच्या वादात आशियांतील भारताबाहेरचे कम्युनिस्ट पक्ष जवळ जवळ तटस्थच आहेत.

यामुळे जागतिक कम्युनिझमचे अथवा आशियातील कम्युनिझमचेही नेतृत्व आपणास मिळणार नाही आणि भारतावरील चीनच्या आक्रमणा–मुळे आशियातील कम्युनिस्ट भ्याले हे फारसे इष्ट घडले नाही असे माओच्या लक्षात येऊ लागले आहे. यावेळी भारताने चीनशी चीनच्या अटीवर वाटाघाटी केल्या तरच आशियात चीनची इभ्रत राहील हे लक्षात आल्यानेच 'वाटाघाटी करा' 'वाटाघाटी करा', असा तगादा माओने भारतामागे लावला आहे. ● ●

# समारोप ☆ ☆ ☆ ☆ ☆ ☆ ☆ ☆ १०

भारत हे जगातल्या लोकशाही राष्ट्रात आज लोकसंख्येच्या दृष्टीनें मोठ्यात मोठे राष्ट्र असून चीन हे लोकसंख्येच्या दृष्ट्रीने कम्युनिस्ट राष्ट्रातच नव्हे तर साऱ्या जगात लोकसंख्येच्या दृष्टीने मोठ्यात मोठे राष्ट्र आहे. दोन्ही राष्ट्रे मागासलेली आहेत. आणि या दोन राष्ट्रात उभा राहिलेला संघर्ष कोणच्या दिशेने संपतो यावरूनच कम्युनिझम व लोकशाही यामध्ये जगभर चालू असणारा संघर्ष कसा संपेले हे ठरणारसे दिसते. रशिया व चीन यांचे भांडण हे आतां भारत व चीन यांच्या भांडणाचेच एक महत्त्वाचे अंग झाले आहे.

सर्व जग कम्युनिझमखाली आणायचे ही लेनिनची कल्पना होती आणि मॉस्को, पेकिंग, कलकत्ता या क्रमाने क्रांतीची आग भडकत जाईल असे लेनिनला वाटले होते. लेनिन हा आंतरराष्ट्रीय कम्युनिस्टक्रांतिवादी, नित्यक्रांतिवादी होता. रशियात कम्युनिस्ट क्रांति झाल्यावर रशियाने क्रांतीची चुडी घेऊन क्रांतीची आग इतर देशात पेटवत नेली पाहिजे असे त्याचे मत होते. हे मत पुढे ट्रॉटस्कीने पुरस्कारले व आज माओत्सेतुंग तेच सांगतो आहे. तो आपण ट्रॉटस्कीवादी आहो असे म्हणत नाही. आपण लेनिनवादी आहों असे म्हणतो व क्रूश्शॉव्ह टिटो वगैरेनी हा लेनिनचा नित्यक्रांतिवाद सोडला असा माओचा आरोप आहे. पण या वादावादींत थोडेथोडे सत्य व बरीचशी गफलत असून अप्रामाणिकपणाही पुष्कळ आहे.

स्टालिन, क्रुश्शॉव्ह, माओ, टिटो हे सर्वजण स्वतःला लेनिनवादी म्हणवितात पण ते खोटे आहे. लेनिनचा आंतरराष्ट्रीय क्रांतिवाद स्टालिनने सोडला आणि 'एकेका देशात सोशलिझम' हे तत्त्व पत्करले. पुढें भांडवलदार राष्ट्रांशी सहजीवन स्वीकारण्याचे धोरण स्टॅलिनच्या अमदानींतच अमलात आले. पण यामुळे लेनिनचा आंतरराष्ट्रीय कम्युनिझम हा राष्ट्रीय

मराठी ग्रं... दा. क्र. 3084

कम्युनिझम म्हणजे स्वदेशाभिमानी कम्युनिझम झाला आणि पूर्वी स्वदेशाभिमानी झालेली पश्चिमी लोकशाही ही जशी राष्ट्रीय भांडवलशाही बनून साम्राज्यशाही झाली त्याप्रमाणे स्टालिनच्या स्वदेशाभिमानी कम्युनिझमचे रूपांतर रशियन कम्युनिस्ट पक्षाच्या हुकुमशाही सत्तेत होऊन कम्युनिस्ट पक्षाची साम्राज्यशाही सत्ता जगातील इतर राष्ट्रांतल्या कम्युनिस्ट पक्षांवर स्थापन झाली.

दुसऱ्या महायुद्धानंतर स्टालिनने पूर्व युरोपीय राष्ट्रात, सैन्याच्या बळावर कम्युनिस्ट राज्ये स्थापून रशियन कम्युनिस्ट पक्षाच्या साम्राज्या–खाली मांडलिक राष्ट्रांची मालिका स्टालिनने निर्माण केली. माओला ही स्टालिन असेच पिंजऱ्यात पकडू पाहात होता, पण माओ निसटला आणि कम्युनिस्ट साम्राज्यशाही स्थापण्याचा स्टालिनचा सिद्धांत मात्र लेनिनच्या नित्यक्रांतीच्या बुरख्याखाली त्याने स्वीकारला. त्याला आशिया खंडांत कम्युनिस्ट साम्राज्य स्थापायचे होते व आहे. पण रशिया व भारत या दोघांचाही त्याला विरोध झाला आहे व होत आहे.

लेनिनच्या भाकिताप्रमाणे पेकिंगनंतर कलकत्त्यात कम्युनिस्ट क्रांति झाली नाही एवढेच नव्हे. भारतात कम्युनिस्ट क्रांति होणे शक्य नाही, चीनच्या कम्युनिस्ट सापळयात भारत सापडत नाही आणि भारतात लोकशाही दृढमूल होऊन भारताचे सामर्थ्य व आशियातील वजनही वाढत आहे असे माओला दिसले. चीनमध्ये भराभर आर्थिक क्रांति करून भारताच्या पुढे मजल मारावी आणि राजकीय आक्रमक डावपेचानी आग्नेय आशिया गिळंकृत करावा या हेतूने स्वदेशात माओने कठोर हुकुमशाही व परदेशाशी आक्रमणाची धोरणे अवलंबली.

पण काही काळ आर्थिक प्रगति झाल्यावर वाढत्या प्रमाणात कठोर अशा हुकुमशाहीने जिकीरीस आलेल्या चिनी जनतेत मरगळ व ढिलाई आली. तेव्हा हळूहळू चिनी कम्युनिस्टांनी लष्करी हुकुमशाही उपायांचा अवलंब सुरू केला व लष्करी खर्चही वाढत गेला. पण गाईला पान्हा येईना म्हणून तुंबडया लावल्यानंतर दुधाऐवजी फक्त रक्त येते तसे चीनमध्ये

झाले. आर्थिक आपत्ति, उपासमार, असंतोष, दडपशाही या सर्वांत वाढ झाली आणि अशा परिस्थितीतून आंतर राष्ट्रीय साहसबाजी निर्माण व्हावी या इतिहासाच्या क्रमानुसार चीननें भारतावर स्वारी केलीं.

क्यूबावरील रूसो-अमेरिकन वादांत जगांत ॲटॉमिक युद्ध होणार तेव्हा आशियातील रान आपणास मोकाटपणे गिळायला मिळेल अशा अंदाजाने माओने तिबेटातून हिमालयावर उडी घेतली. पुढे ॲटॉमिक युद्ध टळलेले पाहताच ॲटॉमिक युद्ध पुन्हा होईल या भीतीनेच रशियाने माओला मागे खेचले.

माओ हा आपली धोरणे आमूलाग्र बदलण्याबाबत फार धैर्यशाली आहे. १९२७-३४ या कालात दक्षिण चीनमध्ये विस्तीर्ण प्रदेशावर त्याने कम्युनिस्ट राज्य स्थापले होते, पण चँग कै शेक ते नांदू देईना तेव्हा ते राज्य मोडून आपल्या एक लक्ष अनुयायांसह माओ ६ हजार मैल दूर अशा येनान प्रांतात गेला व चँग कै शेकच्या बंदुकीच्या टप्प्यापलीकडे जाऊन एवढी बलवान कम्युनिस्ट सत्ता त्याने स्थापली की अखेर तिने पंधरा वर्षांत सारा चीन व्यापून चँग कै शैकला देशोधडीला लावले. आज चिनी कम्युनिस्टांच्या धोरणात असा एकदम फार मोठा पालट माओ करील काय, अशी शंका त्याच्या धाडशी स्वभावामुळे आणि अफाट कर्तृत्वशक्तीमुळे येते.

पण आज माओ त्यानेच निर्मिलेल्या अजस्त्र क्रांतियंत्राच्या पकडीत सापडला आहे आणि त्यानेच आपल्या राक्षसी वर्तनाने निर्मिलेले शत्रु त्याच्यावर सूड घेण्यासाठी टपले आहेत. आशियांतील तांदुळाचे प्रदेश जिंकल्यावाचून चीनचा आर्थिक प्रश्न सुटत नाही आणि क्रूशेव्ह अथवा केनेडी त्याला आशिया जिंकू देत नाहीत. तेव्हा आंतरराष्ट्रीय युद्ध अथवा अंतर्गत आर्थिक आपत्तींतून उद्‌भवणारे बंड यापैकी काही तरी पत्करणे माओला भाग झाले आहे. म्हणून आपल्या आशियांतील साहसबाजीसाठी क्रुश्चेव्हविरुद्ध जगांतील कम्युनिस्ट पक्षांना उठवून जागतिक कम्युनिस्टांची एकजूट आणि अशा एकजूटीने आशियात आंतरराष्ट्रीय धमकीबाजी

हे धोरण आज माओला अवलंबायचे आहे. आता मॉस्कोशी याबाबत तो तडजोड करू शकणारच नाही.

दोन राष्ट्रांत मतभेद होणे हे स्वाभाविक असते आणि तसाच चीन व रशिया यामध्ये मतभेद झाला असेल असे येथे म्हणता येणार नाही का? अमेरिका व फ्रान्स, अमेरिका व रशिया यांच्यात आज मतभेद व वाद होतातच की नाही? कम्युनिस्टांची स्वदेशाभिमानावर आधारलेली अनेक स्वतंत्र राज्ये झाल्यावर एका रशियन कम्युनिस्ट पक्षाची सत्ता जगातील सर्व कम्युनिस्ट राष्ट्रांवर चालणे केव्हातरी अशक्य होणारच होते. भांडवल–शाही राष्ट्रांची साम्राज्यें मोडली तशी कम्युनिस्टांची साम्राज्ये मोडणार हे इतिहासक्रमागतच असून क्रुश्शॉव्हने काळाचा हा ओघ ओळखला आहे आणि तो चर्चा व वादविवाद यांनी वादग्रस्त प्रश्न मिटवायला शिकला आहे

पण माओची आर्थिक आपत्ति, त्याने दुखविलेलें शत्रु, अंतर्गत उलथापालथीची भीति, तसेंच पश्चिमी राष्ट्रांचा आशियात लढण्याबाबतचा भेकडपणा व आशियांतील राष्ट्रांचा विश्वास संपादन करण्याची पश्चिमी राष्ट्रांची टाळाटाळ, भारतपाकिस्तान तेढ व आशियातील राष्ट्रांचा दुबळेपणा इत्यादि सर्व कारणानी युद्ध ओढवून घेण्याइतका आत्मविश्वास, अधीरपणा, मोह व निकड माओला वाटणे आज अपरिहार्य झाले आहे. पण जगाच्या आजच्या परिस्थितीत माओला यश येणे अवघड दिसते.

● ●

# भाग २ रा

# चीनचे आक्रमण

**दि. २४ मार्च १९६३ रोजी 'चीनचे आक्रमण व नेहरूंचे परराष्ट्र धोरण' या विषयावर फलटण येथे पां. वा. गाडगीळ यांचे झालेले व्याख्यान.**

"माझ्या विवेचनास प्रत्येक वेळी मी नेहरूंच्या उक्तीचा आधार देऊ शकेनच असे नाही. मुत्सद्यांना सर्व गोष्टी त्या त्या वेळी प्रांजळपणे बोलता येत नाहीत. मुत्सद्यांच्या धोरणांचे, इतिहासाचे, मुत्सद्यांच्या कृतीचे व उपलब्ध उक्तींचे चिंतन करून विचारवंतांनी इतिहास समजून घेतला पाहिजे. मायकेल ब्रीचरसारखे अमेरिकन विद्वान चार चार पाच पाच वर्षे नेहरूंचा अभ्यास करण्यांत घालवितात. पण आपल्याकडील विद्वान असा अभ्यास न करता भराभर मते ठोकून देतात हे आपल्या देशाच्या भवितव्याच्या दृष्टीने वाईट आहे.

चिनी आक्रमणाची पार्श्वभूमी आपणास समजून देण्यासाठी मी गेल्या पंधरा वर्षांच्या नहरूंच्या परराष्ट्र धोरणाचे संक्षेपाने समालोचन करतो. लडाखवरील चीनचे आक्रमण व नेफांतील आक्रमण येथूनच सुरवात करतो.

लडाखवर गेली कांही वर्षे चीनचे आक्रमण चालू आहे, पण त्या आक्रमणासंबंधाने 'आक्रमण' हा शब्दही नेहरू वापरत नसत आणि नेफा-वरील आक्रमणाबाबत 'आक्रमण' 'आक्रमण' असा ओरडा नेहरूनी चालू केला व अजून चालू ठेवला आहे, याचे कारण काय अशी एक शंका

... ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ....३६८५८........ विः ...निबंध...
क्रमांक ........९५११........ नों: दि: ५५५८.



नेहमी विचारण्यात येते. मला याचे उत्तर दिसते ते असे की लडाखवरील आक्रमणास एकदा 'आक्रमण' म्हटले म्हणजे आक्रमकांशी रणांगणांत सामना देऊन त्याचा पराभव करावा लागतो. पण लडाखबाबत यात अनेक अडचणी आहेत.

लडाख आणि बाकीचा भारत यांत १० हजार फूट उंचीपासून २५ हजार फूट उंचीपर्यंत आमच्या बाजूने व पुन्हा २५ हजार फुटापासून १६ हजार फुटापर्यंत चीनच्या बाजूने उंच उंच पर्वत शिखरे व भयंकर खोल दऱ्या ज्यात आहेन अशा शेकडो मैल लांबरुंद पर्वतरांगा असून भारताचे सैन्य लडाखमधील आपल्या प्रदेशांत उतरावयाचे तर त्यासाठीं या प्रदेशात रस्ते नाहीतच. या पर्वतराजींतून आरपार अखंड रस्ते करण्याला भारतातले गेल्या पंधरा वर्षांत निर्मिलेले सारे सीमेन्टही पुरले नसते. हल्ली भारत सरकार मधून मधून रस्ते बांधते आहे ते आरपार रस्ते नव्हेत. दोन चेक पोस्ट्स् जवळ जवळ असूनहि दरीमुळे अलग पडतात. त्याना एकत्र सांधण्यासाठी शक्य तेथे वळणावळणाचे रस्ते सरकार बांधते आहे इतकेच.

भारत सरकारला या प्रदेशाकडून सैनिक व शस्त्रास्त्रे फार खर्चाच्या व धोक्याच्या उपायानें न्यावी लागतात. विमानांतून सैनिक, त्यांची शस्त्रास्त्रें व जीवनसाहित्य लडाखमध्यें पोचवावे लागते. ही विमाने, त्यांचे तेल, त्यांचे पायलट हे सर्व एका दुर्मिळ प्रकारचे असावे लागते. ही सर्व अतिशय खर्चाची बाब असून आपणाजवळ ही साधनें फार तोकडी आहेत. उलट चीनच्या बाजूनें १६ हजार फूट उंचीवरील तिबेटचे साडेचार लक्ष चौरस मैलाएवढें म्हणजे भारताच्या दोन पंचमांश विस्ताराचे पठार अगदीं सपाट असे आमच्या लडाखच्या पूर्व भागास लागून असून तेथे जमीन थंडीमुळें दगडासारखी घट्ट असल्यानें चीनला रस्ते करावे लागतच नाहींत.

चीननें लडाखच्या अक्साई चीनच्या भागांत थोडे रस्ते बांधले आहेत. तेथूनच पश्चिमेकडे डोंगराळ प्रदेशास सुरवात होत असून थोड्या श्रमांत ते रस्ते चीनला बांधता आले आहेत. अक्साई चीनच्या भारतीय बाजूस

सैन्य पुढे आणून भारताचा रस्ता रोखावा एवढाच त्यांत चीनचा हेतु आहे; प्रदेशाच्या सपाटीमुळें तिबेटमध्यें कित्येक लक्ष सैन्याचा तळ ठेवून तेथून चटकन लडाखमध्ये जरूर तेवढे सैन्य आणणे चीनला शक्य होते. अशा स्थितीत लडाखवरील चीनचे आक्रमण भारताला केवळ स्वताच्याच बळावर मागे हटविता येणार नाही.

अक्साई चीनमधून चीनने बांधलेला तिबेटला जाणारा रस्ता हा नवा रस्ता नव्हे. चीनमधून व मध्य आशियांतून गेली दोन हजार वर्षें याच रस्त्याने व्यापाऱ्यांचे तांडे तिबेट, ब्रह्मदेश, सयाम, मलाया इकडे जात आले आहेत. त्यासाठी कोणत्याही भारत सरकारची परवानगी कोणी कधी मागितली नाही; कोणत्याही भारत सरकारने त्यासाठी खर्च केला नाही अथवा तेथे कधी आपला वॉचमनही ठेवला नव्हता. चीनने स्नेहभावाने वाटाघाटी करून हा प्रदेश न मागता, हा प्रदेश आपलाच आहे असे वैरभावाने सांगून सशस्त्र आक्रमण केले म्हणून वाद माजला.

पण चीनला आपण लडाखमधून मागे हटवू शकलो नाही तरी लडाखवरील आक्रमणाने भारताच्या अंतर्भूमीस धोका नाही. भारत व लडाख यांच्यामधील दुर्लंध्य पर्वतरांगामुळे चीनलाही भारताच्या अंतर्भागावर आक्रमण करणे अशक्य आहे. म्हणून लडाखवरील चीनचे आक्रमण परतविणे हा मुद्दा अब्रूचा असला तरी तातडीचा नव्हता.

शिवाय अँग्लो-अमेरिकनांची मदत लडाखमधून चीनला मागे हटविण्यासाठी मिळू शकणार नाही असे नेहरूंनी मानण्यालाही पुष्कळ आधार आहे. उलट तिबेटांत चीनने मोठा सैन्यतळ स्थापून लडाखच्या रस्त्याने सन्याची मोठी नेआण चीनने करण्यात रशियाला धोका आहे. कारण रशियाचा लक्षावधि चौरस मैल कमी वस्तीचा प्रदेश, जो सैबेरियात आहे व जो वसाहतयोग्य करणे शक्य असून जो चीनला हवा आहे, त्यांत शिरण्याला चीनला तिबेट-लडाख-सिक्यांग एवढाच मार्ग आहे. म्हणून तिबेट, लडाख, सिक्यांग या प्रदेशांत चीनचे बळ वाढण्यात रशियाला धोका दिसला म्हणजे लडाखवरील चीनच्या आक्रमणाचा

प्रश्न रशियाच्या मदतीने सोडविता येईल असे नेहरूंचे धोरण असल्याचा, पूर्वीपासूनचा माझा कयास आहे.

लडाखमधील भारत-चीन युद्धात रशियाने चीनला पाठिंबा दिला नाही हे रशियाची चीनचे वितुष्ट येण्याचे मुख्य कारण होय, असे अलीकडे लाल चीननेच जाहिरपणे म्हटले आहे. यावरून माझ्या तर्कास पाठिंबा मिळतो. चीन व रशिया यांच्यामध्ये हितविरोध आहे, चीन आक्रमणशील आहे व त्याच्या या स्वभावापासून भारत, रशिया व पश्चिमी राष्ट्रे या सार्‍यांना सारखाच धोका आहे हे प्रमेय समोर ठेवूनच नेहरू गेली चौदा वर्षे परराष्ट्र धोरण हाताळीत आहेत असे मला वाटत आले आहे.

पार्लमेंटात नेहरूंनी नुकत्याच केलेल्या भाषणात १९५० पासून चीनचा भारताला धोका असल्याचे भारत सरकारला दिसले असल्याचे सांगितले त्यावर हे 'नेहरूंचे विधान खोटे आहे, कोणत्याही निवेदनात या विधानाला आधार नाहीं' असे टाइम्स ऑफ इंडियाने आव्हानपूर्वक म्हटले आहे. पण मला वाटते अशा अर्थाची निवेदनें न सापडली तरी वस्तुस्थिति संपादकांनी तपासू नये काय ? पार्लमेंटातल्या त्यांच भाषणात नेहरू म्हणाले 'भारत-चीन सरहद्द विचारात घेता या दोन राष्ट्रात संपूर्ण स्नेह अथवा 'संपूर्ण वैरच राहू शकते' वैर म्हटले की युद्ध आले व युद्धाचा दिवस नेहरूंना दूर ढकलायचा होता, म्हणून मग त्यानी स्नेहाचे धोरण ठेवले. अर्थात त्या काळात चीनपासून भारताला धोका आहे अशा अर्थाचे निवेदन सरकारतर्फे कसे केलेले असणार ?

पण कोरिया प्रकरण हे नेहरूंच्या परराष्ट्रधोरणातील महत्वाच्या दृष्टिकोनाचे एक ठळक उदाहरण आहे. त्या युद्धात चीन आल्यानंतर, चीनशी चीनच्या भूमीवर जाऊन अँग्लोअमेरिकन्स चीनचा लष्करी पराभव करू शकणार नाहीत व बाँबहल्लयाची मदत घेऊनही चीनचा पराभव ते करू शकणार नाही ही गोष्ट अँग्लोअमेरिकनांनाच पटली व म्हणून ३८ अक्षांशावर युद्धसमाप्ती करण्याचा नेहरूंचा सल्ला अँग्लोअमेरिकनांना ऐकावासा वाटला.

आयसेनॉवरने तर 'रणांगणातून माघार घेऊन कोरियन युद्ध थांबवितो

मला निवडून द्या' अशा अर्थाचे आवाहन मतदारांना निवडणुकीत केले होते. यात दोन महत्त्वाचे मुद्दे आहेत. चीनच्या भूमीवर प्रवेश करून बाँब व लष्कर यांच्या साह्यानेही आपण चीनचा पराभव करू शकणार नाही ही गोष्ट अँग्लोअमेरिकनांच्या लक्षांत आली हा एक मुद्दा आणि रशिया-चीन एकजूट झाल्यास अमेरिका व रशिया याच्या शस्त्रास्त्रांनी जग उध्वस्त होईल हे त्यांना कळून येऊन शक्य तो जगात तिसरे महायुद्ध होऊ देऊ नये, आता अॅटॉमिक युद्ध ही काही 'करून पाहण्यासारखी गोष्ट' नाही हे अँलो–अमेरिकनांना कळले हा दुसरा मुद्दा. यापैकी दुसरी गोष्ट नेहरूंनी जाहीरपणे बोलून दाखवूनच ३८ अक्षांशावर समेट करण्याची सूचना केली.

नेहरूंनी आणखी एक गोष्ट केली ती अधिक महत्वाची होती. ३८ अक्षांशावर समेट करण्याच्या भूमिकेस त्यांनी रशियालाही अनुकूल करून घेतले. याचा अर्थ कोरियाच्या मार्गे आग्नेय आशियात चीन साम्राज्य-विस्तार करील तर त्यात रशियाला स्वत:ला धोका दिसेल हे हेरून नेहरूंनी ३८ अक्षांशावर तडजोड करण्याला स्टालिनची संमति मागितली व मिळविली आणि चीनच्या विस्तारधोरणाला पायबंद घालण्याचें कामी स्टालिनचा नेहरूंनी उपयोग केला असा होतो.

इंडोचीन प्रकरणीहि इंग्लंड, फ्रान्स व रशिया या तिघांना नेहरूंनीच एकत्र आणले व याही बाबतीत चीनला पायबंद घालणे हेच नेहरूंचे उद्दिष्ट होते.

कोरिया आणि इंडोचीन या दोन्ही प्रकरणी रशियाने चीनला अडवून मागे खेचले व याबद्दल चीनला आपला पाणउतारा झालासे वाटते हे चीनचा रशियावर राग असण्याचे कारण आहे असे मद्रासच्या 'हिंदु' दैनिकानें थोड्याच दिवसापूर्वी लिहिले आहे. या दोन्ही प्रकरणी रशियाला वाटाघाटीच्या टेबलाशी आणण्याचे कामी पुढाकार नेहरूंनी घेतला होता हे लक्षांत घेतले म्हणजे १९५० पासून चीनला पायबंद घालणे हे नेहरूंचे उद्दिष्ट होते ही गोष्ट 'टाइम्स'कारानाही मान्य करावी लागेल.

चीनच्या विस्तारवादाची भीति भारताप्रमाणे रशियालाही वाटत

असून युद्धाचा धाक व युद्धाचे कारण या गोष्टी टाळता आल्यास चीनच्या आक्रमक प्रवृत्तीला आवर घालण्यासाठीं रशियाचे साहाय्य मिळू शकेल असा नेहरूंचा अंदाज होता व तो खरा ठरला. यामुळे लढाखचा प्रश्नही आपण असाच सोडवू शकू असे नेहरूंना वाटले असेल तर ते चूक होते असे म्हणता येणार नाही.

अमेरिकेचे मुत्सद्दी ॲव्हरेल हॅरिमन यांनी अलीकडे टी. व्ही. वर दिलेल्या एका मुलाखतीत चीनचा विस्तार आग्नेय आशियात होणे हे रशियाला आवडणार नाही असे दिसते असा शोध लावला आहे ! नेहरूंनी हा शोध कोरिया प्रकरणीच म्हणजे तेरा वर्षापूर्वी लावला ही त्यांची चूक काय ?

नेफा भागावर लाल चीनचे आक्रमण होणार नाही असें नेहरूंना वाटले व हा त्यांचा अंदाज चुकला हे खरे आहे. याबाबत नेहरूंनी जी अक्षम्य चूक केली ती ही की तिबेटच्या पूर्व पठारावर चीनने कित्येक वर्षे मजबूत लष्करी तळ बांधलेला दिसत असता हिमालयावर चीनचे आक्रमण झाल्यास एकादा आठवडाभर तरी चीनपुढें टिकाव धरील असे हिमालयाला सरावलेले सैन्य नेहरूंनी तयार केले नाही. जेथे असे सरावलेले सैन्य होते त्या चिसूलमध्ये भारतीय सैन्याने चीनला खास पाणी पाजले हा ताजा इतिहास आहे.

पण ही नेहरूंची चूक दाखविता आली तरी चीनचा हल्ला नेफावर होणार नाही हा नेहरूंचा अंदाज केवळ चुकला म्हणून निराधार होता असे नव्हे. लडाख चीनने खाल्ला तरी भारताच्या अंत:प्रदेशास धोका येत नाहीं, पण नेफावर चीनचा हल्ला झाल्यास आसाम संकटात यतो, आसामात इंग्रजांचे शंभर कोटी पौंड भांडवल गुंतले आहे ते बुडतें, आणि त्याबाबत इंग्लंड स्वस्थ राहील तर पुढे हाँगकाँगवर इंग्रजांना उदकच सोडावे लागेल, आसामला संकट आल्यास आग्नेय आशिया संकटांत येतो हे अमेरिकेलाही दिसते आणि म्हणून नेफावर चीनची चढाई झाल्यास अँग्लोअमेरिकन्स तिसरे महायुद्ध म्हणजे अॅटॉमिक युद्ध सुरु करतील हे रशियाला कळते व अॅटॉमिक युद्ध रशियाला टाळायचे असल्याने भारताच्या

अंत:प्रदेशाला धोका येईल असे आक्रमण चीनला रशिया करू देणार नाही असा नेहरूंचा कयास होता, तो निराधार नव्हता. यामुळे भारताला संरक्षणसामर्थ्य वाढविण्याला अवधि मिळत होता व तो नेहरू वापरत होते.

नेफाबाबत नेहरूंचा अंदाज चुकला याला अपवादात्मक असे कारण घडले. १९६२ च्या ऑक्टोबर ता.२० च्या सुमारास क्यूबावर रशिया व अमेरिका यांचे ॲटॉमिक युद्ध होईल व मग जगातील बडी राष्ट्रे उध्वस्त होतील, त्यावेळी आपण भारतावर चढाई केल्यास आपल्या वाटेला कोणी जाणार नाही असे चीनला वाटून त्याने नेफावर चढाई केली. क्यूबा प्रकरणी जर खरोखर ॲटॉमिक युद्ध झाले असते तर चीनने कलकत्त्यापर्यंत आघाडी मारून डांगेरणदिवे यांना दिल्लीवर पाठविले असते. क्यूबाप्रकरणी उद्‌भवलेल्या ॲटॉमिक युद्धाचा संभव कोणासही कल्पिता येण्यासारखा नव्हता. क्यूबा व हिमालय यांमधील या संबंधाबाबत 'टाइम्स' मध्ये आलेल्या व्होरा यांच्या वार्तापत्रांत दुजोरा मिळालेला आहे.

(मी हा अंदाज १९६२ च्या ५ नोव्हेंबरला प्रथम मांडला. प्रसिद्ध लेखक जे. जे. सिंग यांनी एप्रिल १९६३ मध्यें 'टाइम्स ऑफ् इंडिया'त लेख लिहून त्याला पुष्टि दिली आहे.)

नेफावर चीनची अकस्मात चढाई झाल्यानंतर चीनने अकस्मात माघार घेतली ती चीन-रशिया संबंधाबाबत नेहरूंनी केलेल्या अंदाजाशी जुळणारी आहे. रशियाने क्यूबात माघार घेऊन ॲटॉमिक युद्ध टाळले. पण आता ते युद्ध चीनच पुन्हा जगावर आणणार आहे असे पाहून रशिया घाबरला व त्यानेच चीनला मागे खेचले हा अंदाज आता जगभर मान्य झाला आहे.

सारांश हिमालयावर चीनचे आक्रमण होताच नेहरूंचे आजवरचे सर्व धोरण चूक होते असे मानणे हे असमंजसपणाचे आहे.

अलिप्ततावादाचे धोरण हे त्रिकालाबाधित सत्य नव्हे. उद्या चीनने आसाम गिळला तर अमेरिकेला भारतात तळ ठेवावा लागेल व भारताला लष्करी साहाय्याच्या करारात जावे लागेलही. निवळ तर्क बोलायचा तर मी

असे म्हणेन की आसाम व कलकत्ता चीनच्या हाती गेला तर भारतावर अलिप्ततावाद सोडण्याची सक्ति परिस्थितीकडूनच होईल. दुसऱ्या महायुद्धांत फ्रेंचांचें मादागास्कर बेट फ्रेंचांना न विचारता चर्चिलने आक्रमण करून ताब्यात घेतले आणि अरेबियन व हिंदी महासागरात ब्रिटिश आरमाराला मादागास्करची गरज आहे असे जगाला सांगितले. हा जुना इतिहास कोणीच विसरू शकत नाही.

नेहरूंचा अलिप्ततावाद हा इतिहासाच्या एका टप्प्यावर आलेला आहे. ॲटॉमिक युद्ध करायचे नाही म्हटले म्हणजे युद्धाची कारणे नाहीशी झाली पाहिजेत आणि शस्त्रास्त्रसाहाय्याच्या करारांनी युद्धाचे वातावरण भडकते म्हणून तसे करार नकोत, असे नेहरूंचे म्हणणे असते. शिवाय मागासलेल्या राष्ट्रांनी पुढारलेल्या राष्ट्राशी शस्त्रास्त्रसाहाय्याचे करार केल्यास मागासलेल्या राष्ट्रांचे स्वातंत्र्य, कर्तबगारी व आत्मविश्वास धोक्यांत येतो असे नेहरूंना वाटते.

आता आंतरराष्ट्रीय युद्धांत अमेरिकेला पडावे लागू नये यासाठी तरी भारताने अमेरिका व रशिया या दोघांशीही मैत्री ठेवणे आवश्यक होय असे अमेरिकेचे हॅरिमन म्हणत असून चीनला लगाम घालण्याची शक्ति रशियात अजून आहे, तिचा उपयोग झाला पाहिजे, असे प्रसिद्ध अमेरिकन सीनेटर माइक मॅन्स्फील्ड यांनीही सूचित केले आहे. तेव्हां हिमालयातील माघारीमुळे नेहरूंचे संबंध धोरण चुकले हे म्हणणे खरे नव्हे.

यापुढे भारताने युद्धाची तयारी करणे आवश्यक आहे. पण माओचा लष्करी पराभव करण्याची महत्त्वाकांक्षा भारताने धरणे हे चूक आहे. त्यासाठी पेकिंग फोडावे लागेल, तिसरे महायुद्ध करावे लागेल, ते माओला हवे आहे अमेरिका आणि रशिया यांनाच नको आहे. अशा स्थितीत चीन व भारत यांचा इतिहास व भूगोल लक्षात घेतल्यास भारत माओचा पेकिंगपर्यंत पाठलाग करू शकेल हे शक्य वाटत नाही.

उलट चीनला युद्ध करणे अशक्य करायला हवे आहे. माझे मित्र प्रा. राम जोशी यांनी अलीकडील एका व्याख्यानात सांगितले की "चीनची आर्थिक घडी विस्कटली असून असंतुष्ट जनतेचे लक्ष युद्धाने बाहेर वेधण्याचा प्रयत्न माओ करतो आहे. निदान पंधरा वर्षे जर त्याला युद्धाची संधि मिळाली नाही तर शस्त्रास्त्रांचा भार व दारिद्र्याचा भार याखाली चिनी कम्युनिझम विशीर्ण होईल (विदर अवे)." मला हे पटते. माझ्या मते नेहरूंचे हेच धोरण असून रशियाचा उपयोग या कामी ते करू पाहात आहेत. ● ●

# प्रश्नोत्तरे

गाडगीळांच्या या भाषणानंतर श्रोत्यानी त्याना प्रश्न विचारले व गाडगीळानी उत्तरें दिली. त्याचा गोषवारा संक्षेपतः पुढे दिला आहे.

**प्रश्न**–आक्रमणाचा नवा संभव जर कमी आहे व आक्रमण जर टाळायचे आहे तर मग संकटकाल चालू ठेऊन चीनच्या आक्रमणाचा संभव नेहरू एकसारखा सांगत आहेत तो कां ?

**उत्तर**–याची कारणे अनेक असू शकतील. चीनची आर्थिक परिस्थिति इतकी बिघडली आहे की आत दडपशाही व बाहेर साहसबाजी या गोष्टी चीनला येथून पुढे सतत करीत राहणे भाग आहे. म्हणून कदाचित चीन अचानक हल्ला करीलही. पूर्वी अचानक हल्ला आला तेव्हा आम्ही गाफील राहिलो व जगात आमचे हसे झाले, ते पुन्हा टाळले पाहिजे. जगातील ज्या राष्ट्रांची मदत आपणास मिळणार त्याना आम्ही सावध राहून प्रयत्नाची शिकस्त करीत आहे, हे पटले पाहिजे. गेल्या

पंधरा वर्षात युद्धभावनेने नियोजन करण्याचे ठरले असता सर्वत्र शैथिल्य राहिले. आता निदान युद्धाची तातडी वापरून तरी लोकांना निर्धाराने व शास्त्रयुक्त पद्धतीने नियोजन अमलात आणण्यास प्रवृत्त केले पाहिजे.

**प्रश्न**–कोलंबो राष्ट्रांची योजना भारताने स्वीकारली व चीनने स्वीकारली नाही, ते का? त्याचे परिणाम काय ?

**उत्तर**–कोलंबो राष्ट्रांनी योजना मांडली व तीसंबंधाने त्यांनीच खुलासा केला. चीनने ८ सप्टेंबरपासून घेतलेला भारताचा मुलुख सोडावा व त्या भागांत पुन्हा आपले सैन्य व नागरिक नेण्याचे स्वातंत्र्य भारताला असावे अशी कोलंबो परिषदेची योजना आहे. पण आता चीनने माघार घेतल्यानंतर चीनने एकदा जिंकलेला व आता सोडलेला भारताचा मुलुख भारताच्या सैन्याने व्यापण्याला चीनचा विरोध आहे. कारण चीनने आक्रमण करून मिळविलेला सारा मुलुख जर पुन्हा भारताच्या ताब्यात द्यायचा तर भारताशी प्रथम आक्रमक युद्ध केले कशासाठी, असे चिनी जनता चिनी सरकारला विचारील व जगातही चीनचे हसे होईल आणि आपला नसलेला मुलुख आपण गिळला होता व तो ओकावा लागला असे चिनी जनतेला व जगाला दिसेल ते चीनला टाळायचे आहे.

**प्रश्न**–चीनचा कम्युनिझम हा समाजवादापासून च्युत झाला आहे काय ?

**उत्तर**–चीनने शेतीक्षेत्रात जी सहकारी अर्थसंघटना केली ती आदर्श असून भारताला जर चीनशी लढायचे असेल तर त्याने चीनसारखी सहकारी अर्थसंघटना केली पाहिजे. पण त्यासाठी लोकशाहीचा त्याग करता कामा नये. स्वत: मार्क्सने लोकशाही सोडली पाहिजे असे कोठेच म्हटले नसून लेनिन व स्टालिन यांनी आणलेली हुकुमशाही व दडपशाही व्यक्तिविकासास अपाय करते. माओ तेच करतो आहे. पण तो मार्क्सच्या

शिकवणीचा अवश्य भाग नव्हे. या हुकुमशाहीत व दडपशाहीत संशय, भीति, अत्याचार, सूडबुद्धि, विद्वेष, क्रूरता यांना बहर येतो व ही परिस्थिति केव्हाच न सुधारता बिघडत जाते. म्हणून लोकशाहीचा अभाव हा चीनचा दोष आहे. सार्वराष्ट्रीय नियोजन ही कम्युनिस्टांची जगाला देणगी असून त्याबद्दल रशियाला व चीनला धन्यवाद ! पण व्यक्तिस्वातंत्र्याचा व लोकशाही हक्कांचा नाश करून एकंदर समाजांत क्रूर, पिसाट विद्वेषाचाच प्रचार व अंमल करणारी राजवट समाजवादी म्हणता येणार नाही.

**प्रश्न**–तिबेटबाबत भारत सरकारचे धोरण रास्त होते काय ? दलाई लामांना तिबेटांत नेऊन आपण गादीवर बसवावे काय ?

**उत्तरर**–चीनने तिबेट घेतला तेव्हा अथवा आताही भारत तिबेटपर्यंत सैन्ये नेऊ शकतच नाही. तसेच स्वतंत्र तिबेट भारताचे मित्रच असेल अशी हमी कोणीच देऊ शकणार नाही. अखेर लडाखचे रक्षणही आम्ही एकटे करू शकणार नाही. म्हणून किंग्स्ले मार्टिनला दिलेल्या मुलाखतीत नेहरूंनी चीनला आंतरराष्ट्रीय दडपणाने आपण लडाखबाहेर घालवू असे म्हटले आहे. तिबेटचे भवितव्यही बड्या राष्ट्रांनीं एकमेकांशी एकजूट होऊन व चीनवर सक्ती करून ठरवावे लागेल. दलाईलामांना तिबेटला नेऊन आपण गादीवर बसवू नये. खिलाफत चळवळीसारखा मूर्खपणा तो ठरेल.

● ●

# भाग ३ रा

# अमेरिका आणि काश्मीर

भारत आणि पाकिस्तान यांचे दरम्यान काश्मीरबाबत जें भांडण गेली पंधरा वर्षें चालले आहे, त्या भांडणास अगदी सुरुवातीला कांहीहि निमित्त घडलेले असो, पण नंतर अमेरिकेचा काश्मीरलोभ हेंच या भांडणाचें मुख्य कारण राहिलेले असून पाकिस्तान हे निमित्तमात्रच आहे.

दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका सर्व जगभर लष्करी-आरमारी-वैमानिक लढाऊ तळ स्थापण्याच्या उद्योगाला लागली. भारत व पाकिस्तान दोन्हीही मागासलेली राष्ट्रें असून दुसऱ्या महायुद्धाच्या शेवटीं भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीस अमेरिकेचे साहाय्य झाले होते व भारत आणि अमेरिका या दोन राष्ट्रांचा स्नेह जडला होता. तेव्हा भारत स्वतंत्र झाल्यावर काश्मीर संस्थान स्वतंत्र राहो अथवा भारतात विलीन होवो, भारतांत अमेरिकेने लष्करी तळ स्थापावा त्याला भारताचा विरोध असणार नाहीं, असें अमेरिका धरून चालली होती. आणि भारतांतला हा अमेरिकन लष्करी तळ काश्मीरमध्यें स्थापावा, अशी अमेरिकेची इच्छा होती असा माझा तर्क आहे.

गेल्या पंधरा वर्षांत अमेरिकन वृत्तपत्रांच्या लिखाणाने या तर्कास आधार मिळालेला आहे.

काश्मीरात लष्करी तळ स्थापण्याची ही आकांक्षा अमेरिकेच्या मनांत नेमकी केव्हां उत्पन्न झाली हें सांगता येणार नाहीं. युरोपांतून दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकेनें आपली सैन्यें हळू हळू परत नेण्याचे योजले होते. झेकोस्लोव्हाकियाची लोकशाही तेथल्या कम्युनिस्टांनी

१९४८ च्या आरंभी स्टॅलिनच्या चिथावणीनें व पाठिंब्यानें बुडविली यामुळें अमेरिकेचें धोरण बदलले आणि अमेरिकेनें नाटो संघटना स्थापण्याचे ठरविले. अमेरिकेच्या लष्करी करारांच्या धोरणांचा संकल्पहि तेव्हांच झाला. त्यावेळीं काश्मीर मिळविण्याची आकांक्षा अमेरिकेच्या मनतां उद्‌भवली असेल.

कदाचित् ही इच्छा त्यापूर्वीचीहि असेल. कारण मॅकार्थरचे राज्य जपानमध्ये होते व आशियांत चीनमध्यें कम्युनिझम वळावत असून रशियन कम्युनिस्टांचे वर्चस्व आशियांत स्थापलें जाऊं नये, यासाठीं कांहीं योजना आंखण्याचे मॅंकार्थरच्या मनांत असावें व त्यासाठीं त्याचा काश्मीरवर डोळा असावा असें वाटते. कांहीं असले तरी १९४७ सालीं भारताची फाळणी झाली त्यावेळेपासून तरी अमेरिकेच्या मनांत काश्मीरबाबत वासना उद्‌भवली असावी.

१९४६ च्या जूनमध्यें शेख अब्दुल्लांना राजे हरिसिंगच्या तुरुंगांतून सोडविण्यासाठीं नेहरू काश्मीरमध्यें कायदेभंग करून घुसले होते. फाळणी अटळ आहे हे नेहरूंच्या लक्षांत त्यावेळीं आलें होतें असें मानण्याला बराच आधार आहे. त्यावेळीं मौलाना आझादसुद्धा सर्वांनी नेहरूंना पाठिंबा दिला असता तर शेख अब्दुल्ला सुटले असते, शेख अब्दुल्लांनीच काश्मीर भारतांत सामील केलें असते व भारताची सैन्यें त्या वेळच्या काश्मीरच्या सरहद्दीवर पोंचली असती आणि नंतर फाळणी झाली त्यावेळीं, काश्मीर पाकिस्तानांत घालण्यास शेख अब्दुल्लांनीच विरोध केला असता. त्यानंतर काश्मीरवर पाकिस्तानची स्वारी झालीच नसती., शेख अब्दुल्लांना स्वतंत्र काश्मीरची चळवळ करण्यास संधि मिळाली नसती आणि आज काश्मीरचा प्रश्न म्हणून कांहीं राहिलाच नसता.

पण त्यावेळीं हंगामी मंत्रिमंडळ होऊं घातले होतें. अशा वेळीं नेहरूंचे ते काश्मीरसाहस पोरकटपणाचे, उल्लूपणाचें आहे अशी सर्वत्र टीका झाली. मौ. आझाद, सरदार पटेल, म. गांधी या सर्वांनी नेहरूंना मागे

खेचले. कोणालाही नेहरूंची दूरदृष्टी नाहीं व नेहरू कोणाला आपल्या धोरणाबाबत विश्वासांत घेत नाहींत, यामुळें या देशांत पुष्कळदां घोटाळे झाले आहेत. त्याचेच हे उदाहरण होते.

दुसऱ्या महायुद्धांत आशियांत आलेल्या अँग्लोअमेरिकन सेनापतींनी काश्मीर पाहिले होतें व काश्मीरमध्यें अमेरिकेचा अॅटॉमिक बाँबचा तळ ठेवता आल्यास सर्व आशियाखंडावर टेळहणी करतां येईल, हे काश्मीरचे हवामान नकाशावरचे काम्मीरचे स्थान व काश्मीरप्रदेशाची उंची या गोष्टी लक्षांत घेणाऱ्या कोणाच्याही लक्षात येण्यासारखे होते. अमेरिकेचा आशियाचे रक्षण करील असा प्रचंड युद्धतळ बांधला जायचा तर अमेरिकेचे पांच दहा हजार लष्करी व मुलकी अधिकारी, त्यांचे नोकर-चाकर, शिपाई-प्यादे, त्यांची कुटुंबें व विलासाची माणसें मिळून एक लाख लोकसंख्या काश्मीरमध्यें आली असती आणि काश्मीरच्या गरीब जनतेलाही धनोत्पादनाचे नव्हे पण, सेवाचाकरीचे, विलासाचे, लाचारीचे (अनीतीचे, व्यसनाचे) खूप रोजगार मिळाले असते. काश्मीरची मागासलेली खूपशी बेकार, दरिद्री, सुरूप, गोरीपान स्त्री-पुरुष जनता, विलासाकरतां खर्चण्याला कोटचावधि डॉलरांचा सदा धबधब्यासारखा वाहणारा पुरवठा, साऱ्या जगांतल्या श्रेष्ठ सौंदर्यानें नटलेली काश्मीरची सव्वालाख चौ. मैल वनश्री, अशा सर्व भव्य व आकर्षक अनुबंधांत अमेरिकेला युद्धतळ बांधण्यासाठीं काश्मीर हवेसे वाटूं लागले असेल व काश्मीरच्या जनतेला असा युद्धतळ हवासा वाटून अमेरिका काश्मीरांत लोकप्रिय होईल असाही अंदाज अमेरिकेच्या संरक्षण खात्याने बांधला असेल तर त्यांत नवल कांहींच नव्हतें. पण भारत सरकार आपल्या लष्करी करारांत सामील होण्याला प्रतिकूल राहील अशी कल्पना अमेरिकेला प्रथम आली नसावी. पुढें काश्मीर प्रश्न युनोंत गेल्यापासून भारत अमेरिकेच्या उलट जाऊं लागला व पाकिस्तान अमेरिकेकडे झुकूं लागले, तेव्हांपासून काश्मीर पाकिस्तानांत घालावें अथवा स्वतंत्र करावे आणि मग तेथें युद्धतळ मिळवावा, हा विचार अमेरिकेंत प्रभावी झाला.

नेहरूंनी अमेरिकेच्या या वासनेला विरोध कां केला याचा विचार आतां महत्वाचा ठरतो आणि तो लक्षांत येण्याला मुळींच वेळही लागत नाहीं. काश्मीरमध्यें अमेरिकेचा लष्करी तळ आला असता तर तिसऱ्या महायुद्धाचा धोका दुर्बल अशा भारताच्या दाराशीची आला असता व हें नेहरूंना टाळायचें होतें. खुद्द काश्मीरमध्यें अमेरिकेची डॉलरशाही एवढी प्रचंड माजली असती कीं काश्मीर सरकार नामधारी राहून मुलुखावर व जनमतावर अमेरिकेचे राज्यच पसरले असते आणि भारताच्या सरहद्दीशी एवढा प्रचंड अमेरिकन युद्धतळ आल्यानंतर भारताला संरक्षणाबाबत स्वाभिमान व आत्मविश्वास राहिला नसता. ज्यांना हें पटत नाहीं, अथवा हें ज्यांच्या लक्षात भरत नाहीं असे हजारो 'अमेरिकॅनिस्ट' या देशांत आहेत, त्यांना राष्ट्रीय स्वातंत्र्याचा पूर्णार्थ कळलेला नसतो आणि म्हणूनच नेहरूंची मनोवृत्ति कळलेली नसते.

काश्मीरची हल्लीची फाळणी हल्ली आहे अशी राहूं देण्यास नेहरू तयार आहेत. याचे कारण पाकिस्तानव्याप्त काश्मीर नुसता वैराण आहे. श्रीनगर खोऱ्यांत नद्या, सरोवरें, बागा, जंगल, फळफळावळ हे सर्व विपुल असून नाजूक हंसतमुख व सुंदर बांध्याची माणसें तेथें आहेत, तसें पाकिस्तानव्याप्त काश्मीर नाहीं म्हणून अमेरिकेचे त्यावर समाधान नाहीं. जगांतल्या कोणत्याहि देशांतले संरक्षणखातें जास्तीत जास्त चैनप्रिय व विलासप्रिय असते, ही गोष्ट जगजाहीर असून अमेरिकेच्या या स्वभावासंबंधानें अधिक लिहिण्याचें कारण नाहीं.

असा युद्धतळ अमेरिकेला काश्मीरात मिळाला असता तर अमेरिका चीनशी लढली असती असे नव्हे, कोरिया, इंडोचीन, लाओस या प्रकरणी अमेरिकेनें आशियाच्या भूमींत चीनशीं लढण्याचें टाळलेच आहे पण चीनशी लढायचे नसले तरी आशियाभर अमेरिकेचा दबदबा दरारा आणि मोह पसरविण्यास काश्मीरच्या युद्धतळाचा उपयोग अमेरिकेस करता आला असता. त्या परिस्थितींत अमेरिकेनें काश्मीरांतील पाकिस्तानचे सरकार अथवा काश्मीर स्वतंत्र असते तर स्वतंत्र काश्मीरचे

सरकार, याला चीनशी सरहद्दसमेट करण्यास सांगून चीनला लडाख देऊन टाकण्यास अमेरिकेनें संमति दिलीच असती. आजचा पाक-चीन सरहद्द करार अमेरिकेच्या संमतीविना झालेला नाहीं. कारण सीटो व सेंटो करारांतील राष्ट्रांना अँग्लो–अमेरिकनांच्या उघड अथवा मूक संमतीशिवाय कम्युनिस्ट राष्ट्रांशी सरहद्दविषयक करार करता येणारच नाहीं.

पाक-चीन सरहद्द करार झाला याचा अर्थ पाकिस्ताननें आपला कांहीं हजार चौरसमैल मुलूख चीनला देऊन टाकून अमेरिकेला युद्धाच्या धोक्यांतून वांचविले असा आहे. काश्मीरवादांतील प्रमुख नायक, एका बाजूस अमेरिका व दुसऱ्या बाजूस नेहरू आहेत, असे म्हटल्यानंतर पाकिस्तानी जनतेचा धर्मवेडेपणा व अमेरिकन डॉलरचे कांहीं पाकिस्तान्यांना मिळणारे तनखे यामुळें काश्मीरवाद जळता राहिला आहे हें स्पष्ट होते. रशियाचा नेहरूंस काश्मीर-प्रकरणीं सतत पाठिंबा आहे याचें कारण रशियाला श्रीनगर-खोऱ्यांत सिक्यांकपासून जवळ अमेरिकेचा युद्धतळ यायला नको आहे. काश्मीरवादांतला मुख्य मुद्दा वर दिला हाच असून बाकीच्या तपशीलवार घडामोडी हा या मुख्य मुद्याचा बुरखा होय. भारत चीनच्या अंमलांत जाऊं नये व कम्युनिस्ट होऊं नये असे जरी अमेरिकेला वाटते तरी भारतांतली लोकशाही बलवान झाली तर आशियांतून अमेरिकेचे वर्चस्व नष्टच होईल, म्हणून स्वतंत्र व लोकशाहीप्रधान भारतावर अमेरिकन वर्चस्व राहावे अशी अमेरिकेची इच्छा आहे व त्यासाठीं काश्मीरमध्यें बलवान युद्धतळ स्थापला जाणें हा मार्ग अमेरिकेच्या दृष्टीनें उत्कृष्ट ठरतो. तसेंच काश्मीर सार्वमतानें अथवा सार्वमतावांचून पाकिस्तानांत गेले तर भारतांत हिंदु-मुस्लिम कलहास नवी संधि मिळून भारतांतील मुसलमान अमेरिकेच्या नादी लागतील व भारत-पाकिस्तानवर वर्चस्व गाजविण्यास अमेरिकेस नवी संधि मिळेल, अशीही आशा अमेरिकेस वाटणें साहजिकच आहे.

जगांतील अनेक राष्ट्रांत, खुद्द पाकिस्तांनात कोटयवधि जनता लोकशाहीवांचून नांदत असतां व उलट भारतातल्या काश्मीरांत

तीन सार्वत्रिक निवडणुकी झाल्या असता अमेरिकेनें काश्मीरांत सार्वमत घेतले जाण्याचा अथवा पाकिस्तानशी भारतानें तडजोड करावी या मताचा हट्टी पुरस्कार कां करावा याचा एरवी खुलासाच होऊं शकत नाहीं. काश्मीरांत पाकिस्तानी सैन्यें बेकायदा आहेत असे अनेक युनो प्रतिनिधींनी सांगितलें असतांहि अमेरिकेनें १९५४ सालीं पाकिस्तानशीं लष्करी संरक्षण साहाय्याचा करार केला. हें अमेरिकेचें वर्तन आंतरराष्ट्रीय कायद्याचा भंग करणारेच होतें. पण तरीहि अमेरिकेनें तो करार केला व त्यानंतर सतत काश्मीर-प्रकरणीं पाकिस्तानला चिथावलें आहे. याचें कारण लष्करी करारान्वयें काश्मीरांत अमेरिकेला युद्धतळ स्थापायला मिळावा हें अमेरिकेचें उद्दिष्ट आहे हे होय.

काश्मीर-प्रकरणीचें यूनोचें स्विडिश प्रतिनिधि गनर यारिंग यांनीं 'काश्मीर प्रश्न आतां उकरून काढूं नका, आशियांतील सामर्थ्यसमतोल विस्कटून जाईल व जागतिक शांततेला धोका येईल' असा इषारा १९५८ च्या आरंभीं दिला होता. तरी अमेरिकेची पाकिस्तानला फूस आहे याचे कारण आशियांतील सामर्थ्यसमतोल विस्कटल्यास अमेरिकेला काश्मीरांत युद्धतळ स्थापण्यास सबब व संधि मिळेल हेंच होय. पाकिस्तानांत गेलीं कांहीं वर्षे अमेरिकेवर शिव्या व विद्वेष यांचा वर्षाव होत असतांहि अमेरिका पाकिस्तान सरकारला फूस व पाठिंबा देते याचें कारण एकदां काश्मीर अमेरिकेच्या युद्धतळासाठीं मिळालें कीं पुढें डॉलरच्या बळावर सर्व विरोध शमवून टाकतां येईल, असा अमेरिकेचा अंदाज आहे.

अशा मार्गानें भारत-पाकिस्तान समेट झाल्यास पाकिस्तानचे सैन्य व भारतीय सैन्य यांची एकजूट करून अमेरिकेच्या वर्चस्वाखालीं बलाढ्य सैन्य आशियांत निर्मितां येईल व मग तें सैन्य चीनविरोधांसाठीं वापरतां येईल, त्यामुळें भारत-पाकिस्तानवर व आशियावर अमेरिकेचे वर्चस्व राहूं शकेल असाही अमेरिकेचा कयास आहे.

अमेरिकेच्या या वासनेंत व डावपेंचात ब्रिटन, कॉमनवेल्थ राष्ट्रें व फ्रेंच या सर्वांचा वाटा किती ?

दा. क. 930८८

काश्मीरांत होणारा युद्धतळ एकट्या अमेरिकेचा होणारच नाहीं. सीटो व सेंटो राष्ट्रांचा तो तळ होईल व त्यावर अमेरिकेचें वर्चस्व राहील हें न सांगतांही कळण्यासारखें आहे. म्हणूनच या सर्व राष्ट्रांनी गेल्या पंधरा वर्षांत पाकिस्तानला फूस दिली असून भारतावर अमेरिकन वर्चस्व यावें असें मानणाऱ्या 'अमेरिकॅनिस्टां'नीही पाकिस्तानशी कांहीं तरी समेट करा, 'अमेरिकेचीही बूज राखा' असा तगादा नेहरूंमागे लावला आहे.

अमेरिकेचे काश्मीरविषयक धोरण आंतरराष्ट्रीय कायद्याचा भंग करणारे, लोकशाहीची विटंबना करणारे, पाकिस्तानांत अमेरिकेला रोज अपमान सोसायला लावणारे व चीन-पाकगट्टीमुळें अमेरिकेची नाचक्की करणारे असतांही अमेरिका ते धोरण चालू ठेवते याचें कारण काश्मीरमध्यें युद्धतळ स्थापण्याची अमेरिकेची दुर्दम वासना हेंच होय. याखेरीज गेल्या पंधरा वर्षांतल्या अमेरिकेच्या काश्मीरविषयक धोरणाचा उलगडा होतच नाहीं.

मी अमेरिकाविरोधी नाहीं,. अमेरिकेंतील लोकशाहीनिष्ठा ही सामर्थ्यशाली व खरीखुरी असून जगांत लोकशाहीचा फैलाव व्हायचा तर अमेरिकेच्या मतसामर्थ्यानें व रणसामर्थ्यानेंच तो होऊं शकेल. पण बाहेरच्या जगांतल्या लोकशाहीबद्दल अमेरिकेला पुरेशी आस्था नसून जगावर वर्चस्व स्थापण्याची अमेरिकेची वासना फार बलवान आहे. अमेरिकेच्या संरक्षणखात्यांत या वासनेचा उगम असून सीटो-सेंटो—नाटोतून तिला बळ मिळाले आहे. ही वासना विफल झाली म्हणजेच अमेरिकेचे काश्मीरविषयक व पाकिस्तानविषयक धोरण बदलेल. म्हणून नेहरूंनी आपला निर्धार व चिवटपणा कायम ठेवला पाहिजे. अखेरीस अमेरिकेचे धोरण असे बदलेल तेव्हां भारत, अमेरिका व रशिया जास्तीत जास्त जवळ येतील.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
क्रमांक 3९६५८ वि: निबंध.
क्रमांक 9५११ नों दि. ५५५८

REFBK-0013094

## शब्दरंजन स्पर्धेची अत्यल्प किंमतींतील
## —संग्राह्य पुस्तकें—

| | | | |
|---|---|---|---|
| श्री मनाचे श्लोक | ... | ... | किं. ६ न. पै. |
| अभंग तुकयाचे | ... | ... | ,, ३० न. पै. |
| महाराष्ट्र गौरव-गीतें | ... | ... | ,, १॥ रुपया |
| शिवलीलामृत (अकरावा अध्याय) | | ... | ,, १० न. पै. |
| श्री व्यंकटेश स्तोत्र | ... | ... | ,, १० न. पै. |
| श्रीपंचरत्न हरिपाठ | ... | ... | ,, ३० न. पै. |
| धर्माचार ... | ... | ... | ,, ५० न. पै. |
| भगवद्गीता... | ... | ... | ,, १५ न. पै. |
| शनिमहात्म्य | ... | ... | ,, १५ न. पै. |
| श्री दासबोध | ... | ... | ,, २ रुपये |
| श्री गणेशगौरव स्तोत्र | ... | ... | ,, १० न. पै. |
| श्री मारुती उपासना | ... | ... | ,, १५ न. पै. |
| आपला राष्ट्रध्वज | ... | ... | ,, २५ न. पै. |
| विवेकानंद गीता | ... | ... | ,, ५० न. पै. |
| हरीपाठ ... | ... | ... | ,, २५ न. पै. |
| आनंदलहरी | ... | ... | ,, ५० न. पै. |
| रक्तलांछित चीन | ... | ... | ,, ५० न. पै. |
| माओचें लष्करी आव्हान | ... | ... | ,, ५० न. पै. |

☆

शब्दरंजन स्पर्धा प्रकाशनांचे प्रमुख विक्रेते :

**मे. समर्थ ग्रंथभवन,** बनाम हॉल लेन, मुंबई ४

**पुस्तकांची मागणी परस्पर त्यांचेकडेच करावी**

---

पोस्टेजसह पैसे आगाऊ पाठवा. व्ही. पी. ची प्रथा नाहीं.